follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd No.७२१०५/९९ ✻ वर्ष २५ ✻ अंक ३१० सातारा ✻ शुक्रवार दि १० ऑगस्ट २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/

# नीरज चोप्राची रौप्यपदकाला गवसणी

## ऐतिहासिक थ्रो करत पॅरिसमध्ये भारताला मिळवून दिलं पाचवं पदक

**नवी दिल्ली :** भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्राने रौप्यपदकाला गवसणी घालत भारताला पॅरिस ऑलिम्पिकमधील पाचवे पदक मिळवून दिले आहे. नीरज चोप्राने भालाफेक स्पर्धेच्या अंतिम फेरीत ८९.४५ थ्रो करत रौप्य पदक मिळवले आहे. यंदाच्या ऑलिम्पिकमधील भारताचं हे पहिलं रौप्य पदक आहे. नीरज चोप्राचे अंतिम फेरीत पाचपैकी ४ थ्रो फाऊल गेले पण त्याने दुसऱ्याच थ्रोमध्ये ८९ मी चा टप्पा गाठला आणि अर्शद नदीम वगळता इतर कोणताही खेळाडू या क्रमांकापर्यंत पोहोचू शकला नाही. पाकिस्तानचा अर्शद नदीम प्रथम तर भारताचा नीरज चोप्रा दुसऱ्या स्थानी आला आहे. तर तिसरा क्रमांक ग्रेनेडाच्या अँडरसन पीटर्सने ८८.५४ मीटरसह मिळवला.

नीरजने यंदाच्या मोसमातील ८९.४५ हा सर्वोत्कृष्ट थ्रो केला आहे. या सर्वोत्कृष्ट थ्रोसह त्याने रौप्यपदकासह त्याचं दुसरं ऑलिम्पिक पदक मिळवलं आहे. अशाप्रकारे नीरज चोप्रा ट्रॅक आणि फील्ड स्पर्धेत दोन पदके जिंकणारा पहिला भारतीय खेळाडू ठरला. गेल्या ऑलिम्पिक स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या नीरज चोप्राने दुसऱ्या प्रयत्नात सर्वाधिक ८९.४५ मीटर भालाफेक केली, तर अर्शद नदीमने ९२.९७ मीटरसह ऑलिम्पिक विक्रम केला. नीरज चोप्राने टोकियो ऑलिम्पिकमध्ये ८७.५८ मीटर फेक करून सुवर्णपदक जिंकले होते, तर त्याची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी ८९.९४ मीटर आहे, जी त्याने २०२२ मध्ये स्टॉकहोम डायमंड लीगमध्ये रौप्य पदक जिंकून मिळवली होती. मात्र दोन मीटर अधिक फेक करून त्याला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

### दोन पदके जिंकणारा चौथा भारतीय

**नीरज चोप्रा भलेही सुवर्णपदक जिंकू शकला नसेल, पण असे असतानाही त्याने एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला. दोन वैयक्तिक ऑलिम्पिक पदके जिंकणारा तो स्वातंत्र्यानंतरचा केवळ चौथा भारतीय खेळाडू ठरला. स्वातंत्र्यानंतर, फक्त बॅडमिंटनपटू पीव्ही सिंधू (एक रौप्य आणि एक कांस्य), कुस्तीपटू सुशील कुमार (एक रौप्य आणि एक कांस्य) आणि नेमबाज मनू भाकेर (दोन कांस्य) यांनी भारतासाठी दोन ऑलिम्पिक पदके जिंकली आहेत.**

भालाफेकच्या अंतिम फेरीत नीरज चोप्राची सुरूवात फारच निराशाजनक झाली. पण त्याने दुसऱ्याच प्रयत्नात ८९.४५ थ्रो करत दुसरे स्थान निश्चित केले. मात्र पुढील तिन्ही थ्रो नीरजचे फाऊल राहिले, त्यामुळे तो निराशही दिसत होता. पण त्याचा दुसरा थ्रो इतका कमाल होता की त्याने आपले दुसरे स्थान कायम ठेवले. टोकियो ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकलेल्या नीरजने भारतीयांच्या अपेक्षा




कायम ठेवत भारतासाठी पदक जिंकलेच. तर पहिला क्रमांक पटकावत सुवर्णपदकाला गवसणी घातलेल्या अर्शदने या अंतिम फेरीतील दुसऱ्या प्रयत्नात तब्बल ९२.९७ मी. लांब भाला फेकत नवा ऑलिम्पिक विक्रम केला आहे. याआधी ९० मी. लांब भाला फेकण्याचा विक्रम होता. पण अरशदने हा विक्रम मोडला. आता तो अंतिम फेरीत पहिल्या स्थानी आला. तर नीरज चोप्राला मागे टाकले आहे. नीरज ८९.४५ मीटर फेक करून दुसरा आला आहे.

## महत्त्वाचे

### श्रीरंग बारणे यांच्या निवडीला न्यायालयात आव्हान

**पिंपरी :** मावळ लोकसभा मतदारसंघातून शिवसेना शिंदे गटाचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या निवडीला पराभूत अपक्ष उमेदवार ॲड. राजू पाटील यांनी मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. त्यांनी बारणे यांच्यावर धार्मिक ध्रुवीकरणासह अनेक आरोप केले असून स्थानिक प्रशासनाने आपल्या तक्रारींची दखल घेतली नसल्याचेही त्यांचे म्हणणे आहे.

मावळ लोकसभा मतदारसंघात शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे संजोग वाघेरे यांचा पराभव करून बारणे निवडून आले आहेत. या मतदारसंघात निवडणूक प्रक्रियेत अनेक गैरप्रकार झाले. त्याबद्दल आपण स्थानिक प्रशासनाकडे तक्रारी केल्या. मात्र, त्याची दखल घेण्यात आली नाही, असा आरोप करीत पाटील यांनी उच्च न्यायालयात दाद मागितली आहे.

प्रचारादरम्यान बारणे यांनी धार्मिक ध्रुवीकरण करून मते मिळविली. त्याचे पुरावे याचिकेसोबत जोडण्यात आले आहेत. याबाबत निवडणूक काळात प्रशासन आणि पोलिसांकडे केलेल्या तक्रारीची दखल घेण्यात आली नाही, असे पाटील यांनी सांगितले.

या मतदारसंघात मतमोजणीच्या दिवशी अनेक अनोळखी लोक मतदान केंद्रात फिरत होते. त्याबद्दलही आपण पोलिस आणि प्रशासनाकडे तक्रार केली. त्याचीही दखल घेण्यात आली नाही, असा पाटील यांचा दावा आहे. या मतदारसंघात झालेले मतदान आणि मोजणी करण्यात आलेली मते यामध्ये ५७३ मतांची तफावत आहे. एवढी मोठी तफावत हे मतदानात गैरप्रकार झाल्याचे दाखवून देत आहे, असाही पाटील यांचा दावा आहे.

### राज्यातील भटक्या जमातीमध्ये नव्या जातींचा समावेश

**मुंबई :** राज्यातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती/ भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील जातीच्या यादीमध्ये राज्य मागासवर्ग आयोगाच्या शिफारशीनुसार शासनाने काही नवीन जातींचा अंतर्भाव करून तसेच वगळून अद्ययावत यादी तयार केली आहे.

नव्या बदलानुसार यापुढे ठेलारी ही जात 'भटक्या जमाती (ब)' यादीतील अ.क्र. २७ येथून वगळून 'भटक्या जमाती (क)' यादीतील अ.क्र.२९ मध्ये धनगर जातीची तत्सम जात म्हणून समावेश करण्यात आला आहे.

## उद्धव ठाकरेंची सोनिया गांधींशी चर्चा

**नवी दिल्ली :** शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांची येथे भेट घेतली. आगामी विधानसभा निवडणुकीच्या रणनीतीवर चर्चा करण्यासाठी ठाकरे यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची भेट घेतल्यानंतर ही बैठक झाली.

शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्ष यांनी महाविकास आघाडी म्हणून एकत्र निवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे. ठाकरे यांच्याबरोबर त्यांची पत्नी रश्मी आणि मुलगा आदित्यही होते. ठाकरे यांनी कपिल सिब्बल यांचीही येथे भेट घेतली. गुरुवारी संध्याकाळी उशिरा राजधानीच्या तीन दिवसांच्या दौऱ्यानंतर ठाकरे मुंबईत परतले.

उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या घरी जाऊन त्यांच्या पत्नी सुनीता केजरीवाल यांची भेट घेतली. बैठकीला आपचे राज्यसभा सदस्य संजय सिंह आणि राघव चड्ढा देखील उपस्थित होते. उद्धव यांनी सुनीता केजरीवाल आणि त्यांच्या कुटुंबीयांना आश्वासन दिले की, 'या कठीण काळात सर्वजण त्यांच्याबरोबर आहेत.'

उद्धव ठाकरे यांनी दिल्लीत उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांची भेट घेतली. उपराष्ट्रपतींच्या निवासस्थानी झालेल्या भेटीवेळी रश्मी ठाकरे व आदित्य ठाकरे हे उपस्थित होते. उद्धव ठाकरे हे गेले तीन दिवस दिल्लीत आहेत. उपराष्ट्रपतींनी उद्धव ठाकरे यांना भेटण्याची इच्छा व्यक्त केल्याचे शिवसेनेतील सूत्रांनी सांगितले.

## पथारी विक्रेत्यांसाठी केंद्राच्या योजनेची अंमलबजावणी व्हावी

### मुरलीधर मोहोळ यांच्याकडे मागणी

**पुणे :** प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजना अंतर्गत 'स्वनिधी से समृध्दी' (विस्तारीत टप्पा ५) कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी पुणे महापालिकेला आदेश द्यावेत , विक्रेत्यांचे बायोमेट्रिक सर्वेक्षण करावे तसेच हे सर्वेक्षण पूर्ण होत नाही तोपर्यंत अतिक्रमणविरोधी कारवाई थांबवावी,अशी मागणी जनशक्ती पथारी विक्रेता कल्याणकारी संघाने केंद्रीय सहकार, नागरी उड्डान राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे केली आहे. आमदार सुनिल कांबळे, जनशक्ती पथारी विक्रेता कल्याणकारी संघाचे संस्थापक संजय आल्हाट,सरचिटणीस रणजीत सोनवळे,रोहित जसवंते,उपाध्यक्ष बंडू वाघमारे, के. सी. पवार, अभिजीत पाटील उपस्थित होते.

पथ विक्रेता राष्ट्रीय धोरण अस्तित्वात आल्यावर पुणे पालिकेने दहा वर्ष अंमलबजावणी केलेली नाही.गेली दहा वर्ष पथविक्रेता योजनेच्या कुटुंबियांचे सर्वेक्षण प्रलंबित आहे. केंद्र सरकारच्या योजनांचा पथ विक्रेत्यांना लाभ मिळवून देणेकामी व जोपर्यंत पथारी विक्रेत्यांचे बायोमॅट्रिक सर्वेक्षण २०२४ पर्यंत होत नाही तोपर्यंत पथारी विक्रेत्यावरील कारवाई थांबवावी, असे पत्र यासंदर्भात जनशक्ती पथारी विक्रेता कल्याणकारी संघाने २६ फेब्रुवारी २०२४



रोजी दिले होते.त्यावर आयुक्तांकडून कोणतेही उत्तर मिळालेले नाही ,दुसरीकडे पथारी विक्रेत्यांवर अन्यायकारक कारवाई केली जात आहे. पथारी विक्रेत्यांना एकत्रितपणे या योजनेची माहिती देऊन मार्गदर्शन करणे गरजेचे आहे, असे यावेळी संजय आल्हाट यांनी सांगितले.

## बांगलादेशमधून घुसखोरीचा प. बंगालमध्ये प्रयत्न

**कोलकाता :** बांगलादेशात सत्तांतर घरून आले असले तरीही अद्याप शांतता प्रस्थापित झालेली नाही. त्या देशातील अराजकाच्या पार्श्वभूमीवर बांगलादेशींच्या मोठ्या जमावाने उत्तर बंगालमधील सीमारेषेवरून भारतीय भूमीत घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला. बांगलादेशचे जवान, भारताचे सीमा सुरक्षा दल आणि स्थानिक पोलीस यांनी घुसखोरीच्य प्रयत्नात असलेल्या जमावाला पिटाळून लावले.

आरक्षण विरोधी आंदोलनाने हिंसक वळण घेतल्यानंतर पंतप्रधान शेख हसीना यांनी आपल्या पदाचा राजीनामा देऊन भारतात तात्पुरता आश्रय घेतला आहे. नोबेल पुरस्कार विजेते मोहम्मद युनूस आज संध्याकाळी पंतप्रधान पदाची शपथ घेणार आहेत. मात्र, बांगलादेशात सत्तांतर झाले असले तरीही शांतता प्रस्थापित होऊ शकलेली नाही. या पार्श्वभूमीवर अनेक बांगलादेशी नागरिक भारतात घुसण्याचा प्रयत्न करीत आहेत.

शक्यता लक्षात घेऊन ४ हजार ९६ किलोमीटर लांबीच्या भारत-बांगलादेश आंतरराष्ट्रीय सीमारेषेवर सीमा सुरक्षा दलाला रेड अलर्ट देण्यात आला आहे. बीएसएफ कडून सीमारेषेवर करडी नजर ठेवली जात आहे, अशी माहिती बीएसएफच्या वरिष्ठ सूत्रांनी दिली आहे.

दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळात ईशान्येतील विघटनवादी आणि दहशतवादी यांचा बिमोड करण्यात आला होता. मात्र, बांगलादेशातील परिस्थिती पाहता प बंगाल दहशतवादाचा तळ बनू शकतो, अशी भीती आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी व्यक्त केली आहे.

## महायुतीच्या जागावाटपाबाबत लवकरच निर्णय: अजित पवार

**नाशिक :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपासाठी लवकरच चर्चा करून निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रमुख अजित पवार यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.



महायुतीतील ज्या जागांवर ज्या पक्षाचे विद्यमान खासदार असतील त्या जगात त्याच पक्षाला देण्यात येणार आहेत. मात्र, काही जागांवर परस्पर सहमतीने अदलाबदल करण्याची मानसिकता ही महायुतीतील घटक पक्षांनी ठेवली आहे, असेही पवार यांनी स्पष्ट केले.

विधानसभा निवडणुकीपूर्वी मतदारांशी संपर्क साधण्याच्या दृष्टीने राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने जनसंमान यात्रेचे आयोजन केले आहे. या यात्रेच्या माध्यमातून अधिकाधिक मतदारसंघांपर्यंत पोहोचून मतदारांशी संपर्क साधला जाणार आहे, असे पवार यांनी सांगितले.

आपला पक्ष फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारांच्या माध्यमातून पुढे जात आहे. समाजातील प्रत्येक घटकाचा विचार करण्याची आपली भूमिका आहे. महायुती सरकारने समाजातील प्रत्येक घटकासाठी अनेक चांगल्या योजना अंमलात आणले आहेत. या योजनांची माहिती जनसामान्यांपर्यंत जनसमान यात्रेद्वारे पोहोचविण्यात येईल असेही पवार म्हणाल.

मराठा आरक्षणाचा निर्णय घेताना इतर समाजांवर अन्याय होणार नाही अशी सरकारची भूमिका आहे. यापूर्वी देखील त्या दृष्टीने अनेक निर्णय घेण्यात आले. त्याबाबत सर्व पक्षांचे एकमत होते. काही निर्णय उच्च न्यायालयात टिकू शकले नाहीत तर काही सर्वोच्च न्यायालयात टिकले नाहीत. त्यामुळे मराठा समाजाला आरक्षण देताना टिकाऊ आणि इतर समाजावर अन्याय होणार नाही, अशा पद्धतीने निर्णय घेण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, असे पवार यांनी सांगितले.

## संगणक परिचालकांना सरकारने दिलासा द्यावा : आमदार रोहित



**कर्जत :** कंत्राटी नूतनीकरण न झाल्याने राज्यातील २० हजार संगणक परिचालक बेरोजगार होण्याच्या वाटेवर आहेत तरी याबाबत सरकारने तात्काळ ठोस कार्यवाही करून संगणक परिचालकांना दिलासा द्यावा अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी कर्जत येथे पत्रकारांशी बोलताना केली आहे.

या संदर्भात त्यांनी पुढे बोलताना सांगितले की कायमस्वरूपी नोकरी नसल्याने आणि अल्प मानधन असल्याने संगणक परिचालक मानसिक तणावात असतानाच आता त्यांच्यावर बेरोजगार होण्याची वेळ आली आहे.

परिणामी राज्यभरातील संगणक परिचालक संपावर जाण्याची देखील तयारी करत असून तसे झाल्यास ग्रामीण भागातील नागरिकांची गैरसोय होऊ शकते. यामुळे सरकारने या संदर्भात ठोस कार्यवाही करून संगणक परिचालकांना दिलासा द्यावा अशी मागणी रोहित पवार यांनी केली आहे .

## महाविकास आघाडीत 'छोटा- मोठा भाऊ' नाही, मेरीटवर जागावाटप : नाना पटोले



**मुंबई :** महाविकास आघाडीत कोणीही मोठा भाऊ, छोटा, भाऊ नाही, जागा वाटपाचा निर्णय मेरिटनुसारच होणार आहे. महाविकास आघाडी म्हणूनच या निवडणुकीला सामोरे जात आहोत आणि निवडणुकीनंतर मुख्यमंत्रीपदाचा निर्णय होईल. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनीही अशीच भूमिका मांडलेली आहे अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

गांधीभवन येथे काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांची बैठक पार पडली. या बैठकीला प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, प्रदेश कार्याध्यक्ष माजी मंत्री नसीम खान, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे उपस्थित होते.

बैठकीनंतर प्रसार माध्यमांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, आजच्या बैठकीत जागा वाटपावर प्राथमिक चर्चा झाली तसेच राज्यातील विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. जाहिरनामा समितीचे अध्यक्ष माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण हे समाजातील विविध घटकांशी चर्चा करुन राज्यातील जनतेला अपेक्षित असणारा जाहिरनामा बनवला जाणार आहे.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या दिल्ली भेटीवर बोलताना नाना पटोले म्हणाले की, उद्धव ठाकरे हे काही पहिल्यांदाच दिल्लीला गेलेले नाहीत, ते याआधीही गेले होते. दिल्लीत काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनासह सोनिया गांधी यांनाही ते भेटत आहेत, या भेटीतून वेगळा अर्थ काढण्याची गरज नाही. सोनिया गांधी देशातील महत्वाच्या व्यक्ती आहेत, पंतप्रधानपद नाकारणाऱ्या त्यागमूर्ती आहेत, त्यांच्या नेतृत्वाखाली दोनदा काँग्रेस प्रणित युपीए सरकार देशात सत्तेत होते, त्यांना जर उद्धव ठाकरे भेटत असतील तर त्यात गैर काय? जागा वाटपाची जेंव्हा अंतिम बैठक असेल त्यावेळी उद्धव ठाकरे व शरद पवार यांच्याशी चर्चा होईल, असे नाना पटोले म्हणाले.

## विधानसभेला पाडायचे, की उभे करायचे हा निर्णय अंतरवालीतील बैठकीत : मनोज जरांगे

सांगली : विधानसभा निवडणुकीत पाडायचे, की उभे करायचे याचा निर्णय २९ ऑगस्ट रोजी अंतरवाली सराटीमध्ये होणाऱ्या बैठकीत घेण्यात येणार असून, आता मराठा समाजाने राजकीय पक्ष, नेता याच्या मागे न लागता मुला-बाळांच्या भवितव्यासाठी आरक्षणाच्या लढ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी गुरुवारी केले.

जरांगे यांच्या शांतता फेरीचे आज, गुरुवारी सांगलीत आगमन झाले. मिरजेत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून दुचाकी फेरीने विश्रामबाग येथे आगमन झाले. यानंतर पायी शांतता फेरी राम मंदिर चौकापर्यंत काढण्यात आली. त्यानंतर जरांगे यांची जाहीर सभा झाली.




या वेळी जरांगे म्हणाले, की माझा लढा हा मराठा समाजासाठी आहे. आम्हाला आरक्षण पाहिजे, ते पोराबाळांच्या भविष्यासाठी. आता मागे हटणार नाही. मला समाजाच्या लढ्यापासून परावृत्त करण्यासाठी वेगवेगळे प्रयोग उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करत असून, माझ्यावर वेगवेगळ्या लोकांच्या टोळ्या सोडण्यात आल्या आहेत. छगन भुजबळ, प्रवीण दरेकर, राणे यांच्यासारख्यांना माझ्यावर टीका करण्यास सांगण्यात आले आहे. माझ्या मागे एसआयटी चौकशीचा ससेमिरा लावण्यात आला असून, गेवराईला नोटीस पाठविण्यात आल्याची माहितीही आज मिळाली. मात्र, मी अशा कृत्यांना भीत नाही.

येत्या विधानसभा निवडणुकीत पाडायचे की उभे करायचे, याचा निर्णय दि. २९ ऑगस्ट रोजी आंतरवाली सराटी येथे होणाऱ्या बैठकीत घेतला जाईल. मात्र, जर उमेदवार उभा करण्याचा निर्णय झाला, तर मिळेल त्या उमेदवाराच्या पाठीशी समाज म्हणून ताकतीने उभे राहा. आपली सत्ता आली, तर सर्व समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न मिटवू. धनगर समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न पहिल्या कॅबिनेटमध्ये संपवू, असे सांगणारे दहा वर्षे हा प्रश्न सोडवू शकले नाहीत. यामुळे राजकीय पक्ष, नेता यापेक्षा आपला समाज मोठा हे प्रत्येकाने ओळखून यापुढे वाटचाल करावी असे आवाहन त्यांनी केले.

# उद्धव ठाकरेच असणार महाविकास आघाडीच्या मुख्यमंत्रीपदाचा चेहरा

**नवी दिल्ली :** आगामी विधानसभा निवडणुकीत शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे हेच महाविकास आघाडीच्या वतीने मुख्यमंत्री पदाचा चेहरा असतील, असा निर्णय काँग्रेस श्रेष्ठींच्या उपस्थितीत महाविकास आघाडीने घेतला असून त्याबाबतची अधिकृत घोषणा लवकरच करण्यात येणार आहे. उद्धव ठाकरे यांच्या दिल्ली दौऱ्यात महाविकास आघाडीतील जागा वाटपाचे प्राथमिक सूत्रही निश्चित करण्यात आले आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीची रणनीती निश्चित करण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या निवासस्थानी राहुल गांधी यांच्याशी चर्चा केली. या चर्चेत उद्धव ठाकरे हे महाविकास आघाडीच्या मुख्यमंत्री पदाचा चेहरा असतील असे स्पष्ट करण्यात आले. तसेच विधानसभा निवडणुकीदरम्यान आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना उद्धव ठाकरे गट हे तिन्ही पक्ष एकत्र असल्याचे मतदारांमध्ये ठसविण्यासाठी तिन्ही पक्षांची एकत्रित वॉर रूम असेल. महत्त्वाच्या ठिकाणी होणाऱ्या सभांना तीनही पक्षांचे नेते उपस्थित असतील, असेही या चर्चेत ठरविण्यात आले.

लोकसभा निवडणुकीत दमदार कामगिरी करणाऱ्या काँग्रेस पक्षाला विधानसभा निवडणुकीत सर्वाधिक जागा मिळणार असून त्या खालोखाल शिवसेना उद्धव ठाकरे गट जागा लढविणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला तिसऱ्या क्रमांकाच्या जागा मिळणार आहेत. महाविकास आघाडीतील घटक पक्षांकडे सध्या असलेल्या जागा कायम राहणार असून त्या १५५ जागा वगळता इतर जागांवर जागा वाटपा दरम्यान चर्चा होणार आहे. निवडून येण्याची क्षमता हा महाविकास आघाडीचा जागा वाटपाचा प्रमुख निकष असणार आहे.



# लाडकी बहिण योजनेचा अडीच कोटी महिलांना लाभ

**विधान परिषद उपसभापती डॉ नीलम गोरे यांची साताऱ्यात माहिती**

सातारा : राज्यातील वातावरण गढूळ असलंतरी मुख्यमंत्री माझी बहीण लाडकी योजनेमुळे महिलांत उत्साहाचे वातावरण आहे. यातून राज्यातील अडीच कोटी बहिणींना लाभ मिळेल. त्यामुळे या योजनेकडे दुषित म्हणून पाहू नये. तसेच येत्या विधानसभा निवडणुकीतही राज्यात महायुतीलाच चांगले यश मिळेल, असा विश्वास विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केला.

सातारा येथे आयोजित पत्रकार परिषदेत उपसभापती गोऱ्हे बोलत होत्या. यावेळी शिंदे सेनेच्या प्रवक्त्या ज्योती वाघमारे, उपनेत्या कलाताई शिंदे, सांगली संपर्कप्रमुख सुनीता मोरे, सातारा जिल्हा महिलाप्रमुख शारदा जाधव आदींसह शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते. सातारा येथे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण सन्मान यात्रे अंतर्गत जिल्ह्यातील महिलांचा मेळावा झाला. या मेळाव्यासाठी आल्यानंतर गोऱ्हे यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

उपसभापती गोऱ्हे म्हणाल्या, लोकसभा निवडणुकीच्यावेळी सातारा येथे कार्यक्रमाच्यानिमित्ताने येणे झाले होते. लोकसभा निवडणुकीत राज्यात महायुतीला संमिश्र यश मिळाले. शिवसेनेचेही सात खासदार निवडूण आले आहेत. आताच्या विधानसभा निवडणुकीतही युतीला यश मिळेल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. याची मदत याच महिन्यात महिलांना मिळणार आहे. या योजनेमुळे महिलांत आत्मविश्वास आला असून उत्साहही निर्माण झालेला आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमध्ये आतापर्यंत दीड कोटी अर्ज आले आहेत. १५ लाखांच्या आसपासून नामंजूर झाले आहेत, असे सांगून उपसभापती गोऱ्हे पुढे म्हणाल्या, ज्या महिलांचे अर्ज बाद झालेत, ते कायमस्वरुपी नाहीत. काही तांत्रिक चुका राहिल्या असतील. तरीही काही महिला या योजनेपासून दूर राहिल्यातरी त्यांना इतर योजनांमधून लाभ देता येऊ शकतो. विधानसभा निवडणुकीपुरतीच ही योजना नाही. कायमस्वरुपी योजना चालणार आहे. त्यामुळे या योजनेबाबतच्या अफवांवर विश्वास ठेवू नये.

# संभाजी ब्रिगेडचे २२ ऑगस्ट रोजी वाशी येथे राज्य संमेलन

**सातारा :** संभाजी ब्रिगेडचे राज्यस्तरीय संमेलन ठाणे जिल्ह्यातील वाशी येथे विष्णुदास भावे नाट्यरंग मंदिरामध्ये आयोजित करण्यात आले आहे .या निमित्ताने विविध कार्यक्रम होत असून कार्यक्रमाचे उद्घाटन खासदार अमोल कोल्हे अभिनेते सयाजी शिंदे व आमदार रोहित पवार यांच्या उपस्थितीत होणार असल्याची माहिती ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण दादा गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली

यावेळी प्रदेश कोषाध्यक्ष अमोल काटे, राज्य संघटक प्रदीप कणसे ,जिल्हाध्यक्ष शिवम कदम, कार्याध्यक्ष सुमित भोसले, शहराध्यक्ष अनिकेत मोरे, व जिल्हा संघटक अभिजीत निकम इत्यादी यावेळी उपस्थित होते.

प्रवीण गायकवाड पुढे म्हणाले संभाजी ब्रिगेडने गेल्या दहा वर्षांमध्ये अर्थकारण चळवळीला प्राधान्य दिले आहे . आर्थिक साक्षरता घडवणे तरुणांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे ही यामागची हेतू आहेत .दिनांक २२ ऑगस्ट रोजी संभाजी ब्रिगेडचे पंधराशे प्रतिनिधींचे राज्य संमेलन वाशी येथे विष्णुदास भावे नाट्यगृहामध्ये होणार आहे.

या निमित्ताने विविध कार्यक्रम होत आहेत प्रसिद्ध लेखक प्रफुल वानखेडे यांची मुलाखत अभिजीत कारंडे घेणार आहेत .ज्येष्ठ व्याख्याते निरंजन टकले गांधींच्या स्वप्नातला भारत या विषयावर व्याख्यान देणार आहेत तर ज्येष्ठ संपादक श्रीराम पवार हे महाराष्ट्र धर्म या विषयावर बोलणार आहेत तसेच ज्येष्ठ विचारवंत व पत्रकार ज्ञानेश महाराव यांचे सुद्धा विचार या निमित्ताने ऐकावयास मिळणार आहेत

कृषी उत्पन्नावर आधारित उद्योग उभा करून अर्थकारणाला नव्या चेहऱ्या देणाऱ्या काही उद्योगपतींचा सत्कार यावेळी होणार आहे.

# देऊर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जरंडेश्वर डोंगरावर गोळा केले तब्बल ३२ पोती प्लास्टिक

**पिंपोडे बुद्रुक :** प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग, उन्नत भारत अभियान व समान संधी केंद्र आणि यंग इंस्पायरेटर्स नेटवर्क यांच्या संयुक्त विद्यमाने जरंडेश्वर डोंगरावर प्लास्टिक निर्मूलन व डोंगरावरील प्लास्टिक बाटल्या संकलनाचे आयोजन करण्यात आले होते.



प्लास्टिक वापराचे दुष्परिणाम, त्याचा पर्यावरण तसेच मानवी जीवनावर होणारा विपरीत परिणाम लक्षात घेऊन महाविद्यालयाने जरंडेश्वर डोंगरावरील प्लास्टिक निर्मूलनाचे उच्चाटन करणे या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सातारा रोडमार्गे जरंडेश्वर डोंगर चढत चढाईमार्गावरील पायऱ्यांच्याजवळ पडलेले प्लास्टिक गोळा करत सकाळच्या प्रहरात प्लास्टिक कचरा संकलनास सुरुवात केली.

प्लास्टिक समूळ निर्मूलन अशक्य असले तरी जरंडेश्वर डोंगरावर श्रावणात श्री जरंडेश्वर मारुतीरायाचे दर्शन घ्यायला येणाऱ्या भक्त भाविकांची संख्या भरपूर आहे. दर्शनाला येताना पाणी बॉटल, लहान मुलांना अन्नपदार्थ तसेच इतर साहित्यासाठी भक्तगण प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर करतात आणि खाऊन किंवा पाणी पिऊन झाल्यावर पाण्याच्या बाटल्या तिथेच टाकतात. अशा बाटल्यांचा आणि प्लास्टिक राप्पेर हे कुजत नसल्याने त्याचा पर्यावरणावर विपरीत परिणाम होतो. तसेच ते जाळण्याचा प्रयत्न केल्यास प्रदुषण वाढते. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन प्रा.संभाजीराव कदम महाविद्यालयाच्या ५० विद्यार्थ्यांनी प्लास्टिक निर्मूलनाची हि मोहीम पाच प्राध्यापकांना सोबत घेऊन जवळपास चार तास जरंडेश्वर मंदिर परिसर आणि डोंगरावर राबविली. सकाळच्या सत्रात प्रथम या जरंडेश्वर मंदिर परिसरातील केरकचरा झाडूच्या माध्यमातून झाडून हा परिसर स्वच्छ करण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांचे चार गट करून पायऱ्या परिसर, मंदिराच्या मागील परिसर, बारव परिसर, समर्थ रामदास गुंफा परिसर स्वच्छ करून जवळपास चार तास प्लास्टिक बाटल्यांचे संकलन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या ऐतिहासिक चार ठिकाणावरून तब्बल ३२ पोती प्लास्टिक बाटल्यांचे संकलन केले.

यावेळी महाविध्यालयीन विद्यार्थ्यांना जरंडेश्वर या डोंगरावरील १२० औषधी वनस्पतीच्या जाती आणि प्रजाती यांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना प्लास्टिक वापराचे परिणाम आणि त्यामुळे निर्माण होणारे प्रदूषण यावर जनजागृतीचे आवाहन करण्यात आले. यासाठी यंग इंस्पायरेटर्स नेटवर्कचे समन्वयक ऋषीकेश मोरे व महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.शिवाजी चवरे यांचे सहकार्य लाभले. यावेळी अनिकेत खताळ व जान्हवी माने यांनी प्लास्टिक निर्मूलनाबद्दल आपली मनोगते व्यक्त केली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ.कमलसिंग क्षत्रिय, समान संधी केंद्र समन्वयक प्रा. सुर्यकांत अदाटे, सहा. प्रा. वर्षा बडेकर, सहा. प्रा. धनश्री चव्हाण, सहा. प्रा. परीन गांधी, यिन प्रतिनिधी श्री. ओम भोईटे हे यावेळी उपस्थित होते. या प्लास्टिक निर्मूलनाचे नेटके संयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाने प्रा. सुर्यकांत अदाटे, डॉ. कमलसिंग क्षत्रिय, उत्तम आळतेकर व डॉ.संध्या पौडमल यांनी केले होते.

# गुणवंतांचा गौरव हा गोखळी ग्रामस्थांचा उपक्रम स्त्युत्त्य : डॉ. अभिजित जाधव

**गोखळी :** गुणवंतांचा गौरव आणि हर घर झाड हे गोखळी ग्रामस्थांच्या माध्यमातून आयोजिलेले उपक्रम स्त्युत्य व प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन तहसीलदार डॉ. अभिजीत जाधव यांनी केले.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षेत पोलिस उपनिरीक्षकपदी विराज गजानन गावडे, जलसंपदा विभाग नागपूर येथे स्थापत्य अभियंता पदी निखिल ज्ञानेश्वर गावडे, गव्हर्मेंट लॅब असिस्टंट मुंबई पदावर रोहित शुक्राचार्य भारती, एस. आर. पी. एफ. दौंड मध्ये तेजस गोकुळदास कांबळे आणि सातारा जिल्हा परिषद आरोग्य सेविकापदी कोमल बाळासाहेब जगताप व रोहिणी सदाशिव कोठावळे यांची निवड झाल्याबद्दल गोखळी ग्रामस्थांच्यावतीने तहसीलदार डॉ. अभिजित जाधव यांच्या हस्ते त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला आणि यावर्षीच्या हर घर झाड उपक्रमाचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला, त्यावेळी मार्गदर्शन करताना तहसीलदार डॉ. जाधव बोलत होते. यावेळी फलटण पंचायत समिती प्रशासक तथा गटविकास अधिकारी चंद्रकांत





**सत्कारार्थी गुणवंतांसमवेत तहसीलदार डॉ. अभिजित जाधव, गट विकास अधिकारी चंद्रकांत बोडरे व मान्यवर.**

बोडरे, संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष व खटकेवस्तीचे सरपंच बापूराव गावडे, मातोश्री विकास सोसायटी भाडळी खुर्दचे संस्थापक चेअरमन मोहनराव डांगे, कृषी उत्पन्न बाजार समिती फलटणचे संचालक ज्ञानदेव बापू गावडे, सचिव शंकरराव सोनवलकर यांच्यासह गोखळी, पंचबिघा, खटकेवस्ती, गवळीनगर, जगतापवस्ती परीसरातील विविध संस्थांचे आजी माजी पदाधिकारी, ग्रामस्थ आणि प्रा. शाळा व माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते. प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते सरस्वती पुजन आणि दिपप्रज्वलन करण्यात आले.

श्रावण मास आरंभ निमित्त ग्रंथ वाटप आणि हर घर झाड उपक्रमाचे उद्घाटन तहसीलदार डॉ. अभिजीत जाधव यांचे हस्ते करण्यात आले. स्पर्धा परीक्षा व करिअर मार्गदर्शन या विषयावर प्रा. पाटील सर व प्रा. विशाल चव्हाण यांचे व्याख्यान झाले. भव्य तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन राजनंदिनी विठ्ठल पडर व कु. आदित्य रामदास कदम या चिमुकल्यांचे भाषणाने झाले. तहसीलदार डॉ. अभिजीत जाधव आणि गटविकास अधिकारी चंद्रकांत बोडरे यांनी जिल्हा परिषद प्रा. शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या मनोगता बद्दल त्यांचे अभिनंदन करुन प्रशस्तिपत्र देऊन गौरव केला.

# गोरेगाव वांगी जमला छोटेखानी कुंभमेळा

**नाहक काळजी व असमाधानी वृत्तीमुळे मनुष्यप्राणी कायम दु:खी : बेळनाथ महाराज**

**वडूज :** अनावश्यक काळजी, समाधानी वृत्ती नसणे या कारणामुळे मनुष्याचे जीवन दु:खी होते, असे मत भिमाशंकर येथिल प्रसिद्ध कीर्तनकार बेलनाथ महाराज यांनी व्यक्त केले.

खटाव तालुक्यातील गोरेगाव वांगी येथिल वेताळ बाबा देवस्थान ट्रस्टचे गुरूवर्य काशिनाथ गुरव तथा पुजारी बापू यांच्या स्मरणार्थ आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. दरम्यान या कार्यक्रमाच्या निमित्ताने पश्चिम महाराष्ट्रातील विविध देवस्थान, मठाचे पंधरा ते वीस मठाधिपती उपस्थित राहिल्याने या ठिकाणी छोटेखानी कुंभमेळ्याचे स्वरूप आले होते.



**गोरेगाव वांगी येथिल कार्यक्रमात बोलताना बेलनाथ महाराज समोर उपस्थित जनसमुदाय.**

बेलनाथ महाराज म्हणाले, माणसाचा ध्येय नासका, कुजका आहे . हा ध्येय शुद्ध करण्यासाठी नामा शिवाय पर्याय नाही. नामाने काम, क्रोध, मोह, माया नश्ट होते. अनेक साधू संताच्या उपस्थितीमुळे गोरेगाव वांगी गावाला आज कुंभमेळ्याचे स्वरूप आले. गुरू शिवाय चांगली विद्या प्राप्त होत नाही. नशिबातील भोग सुटत नाही. मृत्यू अटल आहे. पण अलीकडे मरण लवकर येत आहे. त्याला राहनीमान व खाणे पिणे कारणीभूत आहे. दहवा, तेरावा कार्य याला शास्त्र आहे. पण अलीकडे सोयीनुसार करत आहे.ही चुकीची बाब आहे असेही यावेळी त्यांनी नमूद केले. सर्वसामान्य लोकांची दु:खे हलकी करण्यासाठी पुजारी बापूंच्या तीन पिढ्या कार्यरत आहेत. या पुण्यकर्मामुळेच आज लोकांची गर्दी जमली आहे.

भजन सम्राट विकास गुरव, सुभाष गुरव, बंडा महाराज, गणेश थोरवे यांनी गायन साथ केली.तर भिकाजी भोसले, श्रीधर माने यांनी हार्मोनियम तर अंकुश महाराज पुसेसावली, अमृत महाराज तुळसन यांनी मृदंगवादन केले.तर म गुरव यांनी चोपदार म्हणून जबाबदारी सांभाळली .यावेळी पुसेगाव येथिल सेवागिरी देवस्थान ट्रस्टचे मठाधिपती सुंदरगिरी महाराज, सोळशी येथिल शनेश्वर देवस्थान ट्रस्टचे नंदगिरी महाराज यांनी वेताळ देवस्थान, शनी देवता यांचे महत्व तसेच अध्यात्म क्षेत्रातील पुजारी बापू तसेच त्यांच्या कुटुंबीयांनी केलेल्या उल्लेखनीय कामाचे कौतुक केले.

दादा महाराज यांनी स्वागत केले. खटाव माण साखर कारखान्याचे व्हॉईस चेअरमन, भाजपा नेते मनोजदादा घोरपडे, राष्ट्रवादीचे नेते नंदकुमार मोरे, माजी सभापती मानसिंगराव माळवे, नाना पुजारी,रामभाऊ देवकर- पाटील, संतोष घार्गे, बबनराव कदम, नंदकुमार खोत, नगरसेवक विशाल पोळ, अर्जुनशेठ कदम, रविंद्र कदम, धनंजय क्षीरसागर, संदीप खाडे आदीसह हजारो भक्तगण व महिला, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रस्त्यावर साहित्य ठेवल्याप्रकरणी चौघांवर गुन्हा

**सातारा :** परवानगी न घेता रस्त्यावर साहित्य ठेवल्याप्रकरणी चौघांवर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. धनंजय श्रीपती साळुंखे, उद्धव अर्जुन साळुंखे, विजय लक्ष्मण धुमाळ व शांताराम अगनु कारंडे (सर्व रा. गोडोली) अशी त्यांची नावे आहेत. याबाबत सातारा पालिकेचे भाग निरीक्षक सतीश यशवंत साखरे यांनी फिर्याद दिली आहे. महिला हवालदार बोराटे तपास करत आहेत.

## दगड उत्खननासाठी परवानगी देण्याची वडार समाजाची मागणी

**सातारा :** नागेवाडी, ता. सातारा येथील गट ३०८/ १ प्लॉट क्र. ७ मध्ये पारंपारिक दगड उत्खनन परवाना मिळण्यासाठी परवानगी मिळावी, यासाठी संजय पवार, अनिल पोवार व नागेवाडीतील वडार समाजाने अतिरिक्त जिल्हाधिकारी जीवन गलांडे यांच्याकडे मागणी केली आहे.

पारंपारिक दगड उत्खननाचे परवाने मंजूर न केल्यास दि. १५ रोजी २० ते २५ महिलांसह वडार समाजातील लोक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सामुहिक आत्मदहन करतील, असा इशाराही निवेदनात दिला आहे. निवेदनावर रंजय पवार, कोंडाबाई शिंदे, योगीता कुराडे, द्रोपदा चौगुले, संगीता कुराडे यांच्यासह अनेकांच्या स्वाक्षरी आहेत.



# महेश कार्यगौरव पुरस्काराने निलेश लाहोटी सन्मानित

**सातारा :** माहेश्वरी समाजामध्ये अत्यंत प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या महेश कार्यगौरव या पुरस्काराने निलेश लाहोटी यांना सन्मानित करण्यात आले.

सातारा येथे महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभेची कार्य समिती बैठक संपन्न झाली. या कार्यक्रमामध्ये सातारा जिल्हा माहेश्वरी समाजाने निलेश लाहोटी यांना महेश कार्य गौरव पुरस्कार देऊन त्यांचा उचित सन्मान केला. निलेश लाहोटी यांना त्यांच्या २८ वर्षाच्या भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या विमा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी व सामाजिक कार्यातील योगदानाबद्दल हा पुरस्कार देण्यात आला.

या कार्यक्रमास माहेश्वरी सभेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मधुसूदन गांधी, सातारा जिल्हा माहेश्वरी सभेचे अध्यक्ष सुदीप भट्टड, सातारा शहर माहेश्वरी सभेचे अध्यक्ष मनीष लाहोटी तसेच संपूर्ण महाराष्ट्रातून माहेश्वरी समाजाचे पदाधिकारी व समाज बांधव उपस्थित होते.निलेश लाहोटी यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल त्यांचे सातारा जिल्ह्यासह विविध जिल्ह्यातील सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक क्षेत्रातील मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून तसेच भ्रमणध्वनीद्वारे अभिनंदन केले आहे.



# कराडला पाणीपुरवठा करणाऱ्या नवीन पाईपलाईनची चाचणी यशस्वी

**कराड :** कराडच्या नवीन जलशुद्धीकरण केंद्रात वारुंजी येथील जॅकवेल मधून आणावयाच्या बहुचर्चित कोयना पुलावरील नवीन पाईपलाईनचे काम पूर्ण झाले आहे. बुधवारी या पाईपलाईनची चाचणी घेण्यात आली. ती यशस्वी झाल्याने कराडकरांचा पाणी पुरवठा लवकरच सुरळीत होण्याची शक्यता आहे.

कराड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या वारुंजी जॅकवेलची कोयना नदीतील पाईपलाईन वाहून गेल्याने गेले तेवीस दिवस कराडकरांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत होते. नगरपालिकेने जुने जॅकवेल कार्यान्वित केले होते, तथापि पुरेसा पाणीपुरवठा होत नव्हता. त्यामुळे वारंजी जॅकवेल मधून नवीन कोयना पुलावरून पर्यायी पाईपलाईन जलशुद्धीकरण केंद्रात आणण्याचे काम वविल च्या निधीमधून सुरू होते. हे काम पूर्ण झाले. त्यानंतर बुधवारी मुख्याधिकारी शंकर खांदारे पाणीपुरवठा अभियंता गिरीश काकडे यांच्या उपस्थितीत चाचणी घेण्यात आली. ही चाचणी यशस्वी होऊन वारुंजी जॅकवेलचा पाणी उपसा सुरू झाला. त्यामुळे कराड शहराला लवकरच पाणीपुरवठा सुरळीत होणार आहे. पुलावरून पाईप लाईन टाकण्याचे काम जे. एस. भालदार इन्फ्रास्टकचर प्रा. लि. यांच्याकडे होते. गेले १२ दिवस मुसळधार पावसाचा अडथळा असतानाही त्यांनी हे काम तातडीने पूर्ण केले.

# तुटपुंज्या मानधनावर काम करणाऱ्या परिचालकांच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह

**मुंबई :** केंद्र सरकारच्या डिजिटलायझेशनच्या धोरणाला अनुसरून महाराष्ट्र सरकारने २०११मध्ये इ-पंचायत ही प्रणाली सुरू केली आणि त्या माध्यमातून नागरिकांना आवश्यक असलेल्या सर्व सेवा संगणकाच्या माध्यमातून तत्काळ देण्याची योजना आखली. या सेवांसाठी गाव पातळीवर सेवा केंद्रे स्थापन केले गेली आणि त्यासाठी राज्य सरकारने संगणक परिचालक म्हणून तब्बल २०,००० युवकांना नियुक्त केले. त्यांचे मासिक मानधन गेली १२ वर्षे केवळ ६९३० रुपये एवढेच होते. हे मानधन ३००० रुपयांनी वाढवण्याचे आश्वासन यंदा मार्च महिन्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले होते मात्र या आश्वासनाची पूर्तता आजतागायत झालेली नाही. या गोष्टीमुळे राज्यभरातल्या संगणक परिचालकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे.

या सेवा देण्यासाठी राज्य सरकारने सीएससी-एसपीव्ही या एजन्सीची नियुक्ती केली होती. ही नियुक्ती ३० जून रोजी संपुष्टात आणली गेल्याने २०,००० संगणक परिचालकांची सेवाही १ जुलैपासून संपुष्टात आली आहे. 'सीएससी-एसपीव्ही'च्या जागी नवीन संस्थेची नियुक्ती न केली गेल्याने आणि नवीन संस्थेची नियुक्ती केली गेली तरी त्यांची संगणक परिचालक म्हणून या युवकांची नियुक्ती होईल की नाही ही शंका असल्याने या २०,००० लोकांच्या रोजगारावर टांगती तलवार लटकत आहे.महाराष्ट्र सरकारचा किमान वेतन कायदा कामगारांना प्रतिमाह १६००० रुपये देण्याचे आश्वासन देत असूनही या कर्मचाऱ्यांना दरमहा केवळ ६९३० रुपये एवढेच मानधन देण्यात येत होते. २०११ मध्ये राज्य सरकारने नागरिकांना ही सेवा पुरविण्यासाठी 'संग्राम' या नावाखाली या प्रकल्पाची स्थापना केली. त्यानंतर वेळोवेळी त्याचे नाव बदलून या केंद्रांना 'सामायिक सेवा केंद्र' आणि त्यानंतर 'आपले सरकार सेवा केंद्र' असे म्हटले जाऊ लागले.

सात कोटी लोकांना नागरिकांना आणि त्यातही ग्रामीण भागातील नागरिकांना ही सेवा पुरविण्यासाठी २०,००० परिचालकांची नियुक्ती केली गेली. त्यांना सीएससी-एसपीव्ही'चे कंत्राटी कर्मचारी म्हणून नियुक्त केले गेले. ही कंपनी 'विशेष हेतू कंपनी' म्हणून स्थापन झाली होती. आपले सरकार सेवा केंद्रांचे कार्य या संगणक परिचालकांच्या माध्यमातून होत होते. त्या माध्यमातून रेल्वे, बसचे आरक्षण, पॅनकार्ड, आधार कार्ड, तसेच विविध कृषी विषयक टेलिफोन बिल यांसारख्या बिलांचा भरणा यांसारखी कामे या केंद्रांच्या माध्यमातून केली जात होती.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# लवाद वकील म्हणून कायदेशीर कारकीर्द घडवा




**पुणे :** लवादामध्ये भारतात आणि जागतिक स्तरावर कायदेशीर करिअरच्या सर्वोत्तम संधी निर्माण झाल्या आहेत. सिव्हिल, क्रिमिनल सारख्या पारंपारिक कायदेशीर बाबींप्रमाणे लवादामध्ये करिअर निवडले पाहिजे. असे विचार मुंबई उच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीश डॉ. शालिनी फणसाळकर यांनी व्यक्त केले.

हिंद लॉ हाऊस प्रकाशनातर्फे

## अधिवक्ता अमन विजय दत्ता लिखित 'द हँडबुक ऑन डोमेस्टिक ऑर्बिट्रेशन इन इंडिया' पुस्तकाचे लोकार्पण

लेखक आणि लवादाचे वकील ॲड. अमन विजय दत्ता लिखित ' द हँडबुक ऑन डोमेस्टिक ऑर्बिट्रेशन इन इंडिया' या पुस्तकाचे प्रकाशन लॉ कॉलेज येथील प्राचार्य पंडित सभागृहात न्यायाधीश डॉ. शालिनी फणसाळकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून त्या बोलत होत्या.

या प्रसंगी जिल्हा सत्र न्यायालयाचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश सुनील वेदपाठक, ज्येष्ठ सॉलिसिटर आणि मध्यस्थ अमित हरियानी, मुंबई उच्च न्यायालयाचे ज्येष्ठ वकील निखिल साखरदंडे, सिंगापूर आंतरराष्ट्रीय लवाद केंद्राचे माजी उपनिबंधक ॲड. गणेश चंद्रू व हिंद लॉ हाऊसचे रमेश सेठी उपस्थित होते.

न्या.डॉ. शालिनी फणसाळकर म्हणाल्या,लवाद हा देशांतर्गत आणि जागतिक पातळीवर कायदेशीर व्यवस्थेचा एक भाग बनला आहे. त्यामुळे पर्यायी विवाद निराकरणाच्या क्षेत्रातील कायदेशीर साहित्य आणि तज्ज्ञांची गरज आहे.

सुनिल वेदपाठक म्हणाले, हे पुस्तक लवादाच्या कायद्याचे सर्वसमावेशक विहंगावलोकन देते. सध्याच्या आणि भविष्यातील न्यायालयीन कामकाजातही ते मदत करेल.

ॲड. अमन विजय दत्ता म्हणाले, भारतातील घरगुती लवादावर केंद्रित असणारे हे पहिले पुस्तक आहे. सुरूवातीपासून शेवटपर्यंत देशांतर्गत लवादावर नेव्हिगेट करण्यात व्यावसायिकांना मदत करण्यासाठी डिझाइन केलेले आहे.

ॲड. अमित हरीआनी म्हणाले, लवादाच्या दाव्यांचा पाठपुरावा करताना उदभवणार्या व्यावहारिक समस्यांना कसे हाताळायचे यावरील हे पुस्तक आहे. यातील केस स्टडीज अभ्यासकांना विवादांना समोरे जाणे सोपे करेल. ॲड. निखिल साखरदंडे आणि ॲड. गणेश चंद्रू यांनी आपल्या भाषणात पुस्तकाच्या अनोख्या स्वरूपाचे कौतुक केले आणि न्यायालयीन भार कमी करण्यासाठी लवादाबद्दल जनजागृती करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. अधिवक्ता परवाझ काझी व रमेश सेठी यांनी सूत्रसंचालन व आभार मानले.

## एकीच्या बळाने बेस्ट थांबा पूर्ववत

**मुंबई :** बेस्ट प्रशासना तर्फे कोणतीही पूर्व सूचना न देता अनेक वर्षे एकाच ठिकाणी असलेला बेस्ट बस थांबा स्थलांतरित करण्यात आला होता. मात्र अंध, अपंग, वृद्ध, विद्यार्थी तसेच सर्व सामान्य रहिवासी एकत्र आल्याने बेस्ट थांबा पूर्ववत करण्यात आला. राजेंद्र नगर येथील ४६१,२२६,२२३ क्रमांक चा बेस्ट बस थांबा अचानक हलवुन नव्याने जनरल करिअपा पुलावर (पश्चिमेकडून येणारा) स्थलांतरित करण्यात आला होता. नव्याने हलवलेल्या या बस थांब्या मुळे अंध, अपंग, वृद्ध, विद्यार्थी वर्गाला तसेच सर्व सामान्य रहिवाशांना देखील अडचणीचा अपघातांना निमंत्रण देणारा ठरत होता.

## महागणपती मंदिरात विनायकी चतुर्थी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम

**रांजणगाव :** अष्टविनायकापैकी एक असलेल्या श्री क्षेत्र रांजणगाव गणपती, ता. शिरुर येथील महागणपती मंदिरात विनायकी चतुर्थी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले.

आज विनायकी चतुर्थी निमित्त पहाटे ५ वाजता अभिषेक,सकाळी ७ वाजता गणेश याग आणि १० वाजता सत्यविनायक पूजा देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षा स्वाती पाचुंदकर व राजमुद्रा पतसंस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय पाचुंदकर यांच्या हस्ते झाला.

विनायकी चतुर्थी निमीत्त दुपारी १२ वाजता मुख्य विश्वस्त ओमकार देव यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली.तसेच महागणपतीस माजी मुख्य विश्वस्त कै. वसंतराव देव यांच्या प्रित्यर्थ महागणपतीस १००१ संत्र्यांचा महानैवेद्य तसेच गणेशभक्त राजेंद्र नवले यांच्या वतीने आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती.येथील प्रगतशील शेतकरी आनंदराव पाचुंदकर पाटील यांच्या वतीने विनायकी चतुर्थी निमित्ताने महाप्रसादाचे आयोजन केले होते, अशी माहिती देवस्थान ट्रस्ट च्या अध्यक्षा पाचुंदकर यांनी दिली.

यावेळी देवस्थानचे मुख्यविश्वस्त डॉ.ओमकार देव, अध्यक्षा स्वाती पाचुंदकर, उपाध्यक्ष संदिप दौंडकर, सचिव डॉ.तुषार पाचुंदकर, खजिनदार विजय देव आदीसह भाविक व ग्रामस्थ उपस्थित होते.

## सपोनि पृथ्वीराज ताटे आणि टीमची दमदार कारवाई घरफोड्याच्या आवळल्या मुसक्या

**सातारा :** जावली तालुक्यातील कुडाळ येथील सेवानिवृत्त कर्मचारी कृष्णा सखाराम शेवते यांच्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने सोन्याचे दागिने व रोख पैशासह तीन लाख तीस हजारांचा डल्ला मारला होता.घटनेचे गांभीर्य ओळखून सपोनि पृथ्वीराज ताटे आणि त्यांच्या टीमने कसून तपास करत या घरफोडीचा छडा फक्त बारा तासात लावला असून शेवते यांच्या मुलगा निलेश यानेच ही घरफोडी केल्याची उकल करून दिवट्या मुलाला अटक केली आहे त्याला न्यायालयाने ९ ऑगस्ट पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. सपोनि ताटे यांनी मेढा पोलीस ठाण्यात नव्यानेच रुजू झाल्यानंतर आपल्या कारभाराची चुणूक दाखवून दिली आहे.

याबाबत पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार कुडाळ येथील कृष्णा शेवते यांच्या राहते बंद घराचे दरवाज्याचे कुलूप काढून कोणीतरी अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून घराचे भिंतीतील लाकडी कपाताचा कडी कोयंडा काढून कपाटातील पाच तोळे वजनाची सोन्याची बोरमाळ व रोख रक्कम असे एकूण ८०,००० रू रोख रक्कम असा ३,३०,००० रू. किमतीचा मुद्देमाल घरफोडी करून चोरुन नेला होता.याबाबतची तक्रार शेवते यांनी पोलिसात दाखल केली होती.गुन्ह्याच्या अनुशंगाने सखोल तपास करत असताना ही घरफोडी शेवते यांचा घरातून विभक्त राहणारा मुलगा निलेश कृष्णात शेवते याने केला असल्याबाबत संशय आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याचेकडे कसून चौकशी केली असता त्याने सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली दिल्याने सदरचा गुन्हा तात्काळ उघडकीस आलेला आहे..

आरोपी निलेश याच्याकडून या गुन्ह्यातील चोरीस गेलेली पाच तोळे वजनाची सोन्याची बोरमाळ तसेच रोख रक्कम ५५,५०० रू.असा एकुन ३,३०,००० रूपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करणेत आलेला आहे. गुन्ह्यातील आरोपीला न्यायालयाने ९ ऑगस्ट पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. सपोनि पृथ्वीराज साठे यांनी मेढा पोलीस ठाण्याचा कारभार हाती घेतल्यानंतर घरपोडी सारख्या होण्याची बारा तासात उकल केल्याबद्दल सपोनि ताटे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

सदरची कारवाई ही पोलीस अधिक्षक समीर शेख,अप्पर पोलीस अधीक्षक आंचल दलाल, उपविभागीय पोलिस अधिकारी बाळासाहेब भालचिम यांचे मार्गदर्शनाखाली केली या कारवाईत सपोनि पृथ्वीराज ताटे,सहा.पोलीस फौजदार विकास गंगावणे,विजय शिंगटे,पो .हवा.डी.जी.शिंदे,पी.डी.माने,पो.कॉ.आर. टी. शेख,सनी काळे,अभिजित वाघमळे यांनी सहभाग घेतला.

## अतिक्रमणे हटवण्यासाठी उपोषणाचा इशारा

**सातारा :** मंगळवार पेठ ते समर्थ मंदिरला जोडणाऱ्या सिटी सर्वे नंबर ४०३, ४०४ येथील वहिवाटीच्या रस्त्यावरील अतिक्रमण काढून रस्त्या तात्काळ रिकामा करावा अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बुधवार दि. १४ रोजीपासून बेमुदत उपोषणाचा इशारा सावित्रा माने यांच्यासह कुटुंबीयांनी दिला आहे.

मंगळवार पेठ ते समर्थ मंदिरला जोडणाऱ्या सिटी सर्वे नंबर ४०३, ४०४ मध्ये अनेकांनी अतिक्रमण केले आहे. यामुळे आम्हा माने कुटुंबाचा वहिवाट रस्ता बंद झाला असून अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. याबाबत सातारा नगरपालिकेकडे वारंवार पाठपुरावा केला आहे. मात्र, संबंधित विभागाकडून याबाबत दखल घेतली जात नाही. या अडथळ्यामुळे स्वातंत्र्य सैनिक कै. गणू माने यांचा मृतदेह झोळीतून न्यावा लागला. यामुळे स्वातंत्र्य सैनिकांची अशी अवहेलना होत असले तर सैनिकी जिल्हा कसे म्हणावे. त्यामुळे दि. १३ ऑगस्टपूर्वी ही अतिक्रमणे हटवावीत अन्यथा बेमुदत उपोषणाचा इशारा माने यांनी दिला आहे.

## सरसकट आले खरेदीचा अखेर निर्णय,बाजार समिती यांना सौदापट्टी करून दराच्या उल्लेखाचेही आदेश



**सातारा :** शेतकरी व इतर घटकांकडून बाजार आवार आणि शेताच्या बांधावर आल्याची खरेदी करताना ती परंपरागत सरसकट पद्धतीने खरेदी करावे असे परिपत्रक राज्याच्या सहकार पणन व वस्त्र उद्योग विभाग पणन संचालनालयाने काढले आहे या निर्णयाचे स्वाभिमानी शेतकरी संघटनेने स्वागत केले आहे .राज्यात वर्षानुवर्षे प्रतवारी न करता सुरू असलेली अनेक खरेदी बंद करण्याचा घाट व्यापाऱ्यांनी घातला आहे .त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडू लागले आहेत, या प्रश्नी महाराष्ट्र शासनाकडून उचित कार्यवाही व्हावी अशा आशयाचे निवेदन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे माजी खासदार राजू शेट्टी यांनी पण मंत्री अब्दुल सत्तार यांना सादर केले होते त्यावर श्री सत्तार यांनी ३० जुलै २०२४ रोजी सिल्लोड येथे बैठक आयोजित केली होती बैठकीत झालेल्या चर्चेनंतर सहकार आणि पणन विभागाने परिपत्रक काढले आहे

परिपत्रकात म्हटले आहे की शेतकरी व इतर घटकांकडून बाजार समिती आवारात येणाऱ्या आल्याची खरेदी करताना ती परंपरागत व सरसकट पद्धतीने खरेदी करावी अशी सूचना बाजार समिती त्यांनी आपल्याकडील परवानाधारक व्यापारी व अडते यांना कराव्यात. तसेच नवे जुने आले वेगळे आणण्याचा आग्रह धरू नये आले खरेदीचा व्यवहार झाल्यानंतर त्याची सौदा पट्टी करावी त्यावर दर कसा देण्यात आला आहे याचा स्पष्ट उल्लेख अधिकृत बिलावरती करावा याबाबत काही तक्रारी बाजार समिती प्राप्त झाल्या असत्या तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्यासाठी बाजार समितीने व्यवस्था करावी .जे व्यापारी शेतकऱ्यांच्या बांधावर आले खरेदी करतात त्यांनीही नवे जुने आले असा वेगळा आग्रह धरू नये बाजार समितीने आल्यास योग्य भाव मिळवून देण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न उपाययोजना कराव्यात . असे पत्रकात नमूद आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाल्याने जिल्हाध्यक्ष राजू शेळके यांनी राज्य शासनाला धन्यवाद दिले आहेत.

## दिव्यांगांनी बीज भांडवल योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**सातारा :** दिव्यांगांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विाागामार्फत बीज भांडवल योजना राबविण्यात येत आहे, या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण अधिकारी नितीन उबाळे यांनी केले आहे.

दिव्यांग व्यक्तीकडे किमान ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. या योजनेचा लाभ १८ ते ५० वयोगटामधील दिव्यांग व्यक्तींना देण्यात येईल. अधिक माहितीसाठी जिल्हा परिषदेमधील जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

## महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ फलटण तालुक्यात १५ गावातील १२९ शेतकऱ्यांना ८२.०७ एकर क्षेत्र होणार वितरीत

**फलटण :** महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ तत्कालीन खंडकरी शेतकऱ्यांपैकी एक एकराच्या आतील देय क्षेत्र असलेल्या १५ गावातील १२९ शेतकऱ्यांना ८२.०७ एकर क्षेत्र वितरीत करण्याचा निर्णय झाला असून होळ येथे लगत देय क्षेत्र उपलब्ध नसल्याने तेथील निर्णय राखून ठेवण्यात आला आहे. आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांच्या प्रयत्नाने हा निर्णय झाला असून सर्व ६ जिल्ह्यातील खंडकरी शेतकऱ्यांना या निर्णयाचा लाभ मिळणार असल्याचे खंडकरी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मणराव निंबाळकर यांनी सांगितले.



महाराष्ट्रातील कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, पुणे, अहमदनगर या ६ जिल्ह्यातील महामंडळाच्या १३ ऊस मळ्यांवर खंडकरी शेतकऱ्यांच्या शेकडो एकर जमिनी महामंडळाकडे वर्षानुवर्षे नाममात्र खंडाने होत्या, नंतर सदर खंड ही बंद झाल्याने आणि वाढत्या कुटुंबांच्या चरितार्थासाठी आपल्या जमिनी पाटपाण्याच्या हक्कासह परत मिळाल्या पाहिजेत यासाठी सतत आंदोलने, निवेदने, मोर्चे, चर्चा, बैठका सुरु होत्या, आंदोलने तीव्र होत गेली, तसतसे शासनाने निर्णय घेण्यास सुरुवात केल्याचे लक्ष्मणराव निंबाळकर यांनी निदर्शनास आणून दिले.

शिवसंदेशकार माजी आमदार कॉ. हरिभाऊ निंबाळकर, मनमाडचे तत्कालीन नगराध्यक्ष,माजी आमदार कॉ. माधवराव गायकवाड, कॉ. पै. बाजीराव जगताप, लक्ष्मणराव निंबाळकर, कॉ. दादा नलवडे वगैरे अनेकांनी खंडकरी शेतकऱ्यांच्या लढ्याचे नेतृत्व केले, त्याशिवाय या आंदोलनात सहभागी होऊन अहोरात्र मेहनत घेणारे अनेक जण यामध्ये सहभागी होते.

सन १९७८ मध्ये

तत्कालीन आमदार डॉ. कृष्णचंद्र भोईटे यांनी विधान सभेच्या माध्यमातून फलटण तालुक्यातील खंडकरी शेतकऱ्यांना २५०० एकर, त्यानंतर तत्कालीन आमदार श्रीमंत शिवाजीराजे नाईक निंबाळकर यांच्या प्रयत्नाने १ हजार एकर आणि सन २०१२ मध्ये तत्कालीन महसूल राज्यमंत्री ना.श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांच्या प्रयत्नाने ७२३ तत्कालीन खंडकरी शेतकऱ्यांना ३७२१ एकर १७ गुंठे क्षेत्र पाट पाण्याच्या हक्कासह परत करण्यात आल्याचे लक्ष्मणराव निंबाळकर यांनी निदर्शनास आणून दिले.

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडील जमिनी खंडकरी शेतकऱ्यांना पाट पाण्याच्या हक्कासह परत मिळाल्या पाहिजेत यासाठी सुरु असलेला लढा आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी पाहिला, अनुभवला होता, विधान सभा निवडणूक प्रचार दरम्यान आंदोलकांशी झालेल्या भेटी, चर्चा यातून त्यांना आंदोलनाची तीव्रता तर समजलीच पण त्या बरोबर सदर मागणी रास्त असल्याचे लक्षात आल्याने विधान सभेत पोहोचताच त्यांनी कायम दुष्काळी पट्ट्यातील शेतीच्या पाणी प्रश्नाबरोबर मतदार संघातील अन्य प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न केले त्यामध्ये शेती महामंडळाकडील खंडकरी शेतकऱ्यांच्या प्रश्नाला त्यांनी प्राधान्य दिले आणि हा प्रश्न धसास लावून राज्यातील खंडकरी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यात पुढाकार घेतला.

महसूल राज्य मंत्री म्हणून मंत्री मंडळ बैठकीत हा विषय मांडल्यानंतर मंत्री मंडळाने या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर समितीची स्थापना करुन त्यांच्यावर या प्रश्नाच्या सोडवणूकीची जबाबदारी सोपविली त्याचा योग्य उपयोग करुन घेत आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी महामंडळाचे कार्यक्षेत्र असलेल्या ६ जिल्ह्यातील खंडकरी शेतकऱ्यांना त्यांच्या हजारो एकर जमिनी पाट पाण्याच्या हक्कासह परत करण्यात यश मिळविले असल्याचे लक्ष्मणराव निंबाळकर यांनी निदर्शनास आणून दिले.

ना. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी समिती सदस्य व अधिकाऱ्यांसमवेत सर्व १३ ऊस मळ्यांना भेटी देवून पाहणी केली, त्याभागातील खंडकरी शेतकऱ्यांशी चर्चा केल्यानंतर आपला सविस्तर अहवाल शासनाला सादर करुन त्याद्वारे खंडकरी शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी पाटपाण्याच्या हक्कासह परत करण्याची शिफारस शासनाला केली.

## कराडला पाणीपुरवठा करणा-या नवीन पाईपलाईनची चाचणी यशस्वी

**कराड -** कराडच्या नवीन जलशुद्धीकरण केंद्रात वारुंजी येथील जॅकवेल मधून आणावयाच्या बहुचर्चित कोयना पुलावरील नवीन पाईपलाईनचे काम पूर्ण झाले आहे. बुधवारी या पाईपलाईनची चाचणी घेण्यात आली. ती यशस्वी झाल्याने कराडकरांचा पाणी पुरवठा लवकरच सुरळीत होण्याची शक्यता आहे.



कराड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या वारुंजी जॅकवेलची कोयना नदीतील पाईपलाईन वाहून गेल्याने गेले तेवीस दिवस कराडकरांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत होते. नगरपालिकेने जुने जॅकवेल कार्यान्वित केले होते, तथापि पुरेसा पाणीपुरवठा होत नव्हता. त्यामुळे वारंजी जॅकवेल मधून नवीन कोयना पुलावरून पर्यायी पाईपलाईन जलशुद्धीकरण केंद्रात आणण्याचे काम वविल च्या निधीमधून सुरू होते. हे काम पूर्ण झाले. त्यानंतर बुधवारी मुख्याधिकारी शंकर खांदारे पाणीपुरवठा अभियंता गिरीश काकडे यांच्या उपस्थितीत चाचणी घेण्यात आली. ही चाचणी यशस्वी होऊन वारुंजी जॅकवेल चा पाणी उपसा सुरू झाला.

त्यामुळे कराड शहराला लवकरच पाणीपुरवठा सुरळीत होणार आहे.पुलावरून पाईप लाईन टाकण्याचे काम जे. एस. भालदार इन्फ्रास्टकचर प्रा. लि. यांच्याकडे होते. गेले १२ दिवस मुसळधार पावसाचा अडथळा असतानाही त्यांनी हे काम तातडीने पूर्ण केले.

## रविवारी इंद्रजित देशमुख यांचे व्याख्यान...

सातारा : स्पर्धा परिक्षा, उद्योग व व्यवसायाच्या माध्यमातून आपले आयुष्य स्थिर करण्याचा प्रयत्न करणार्या युवकांना व पालकांना योग्य प्रबोधन व मार्गदर्शन घडावे. यासाठी अध्यात्मिक व प्रेरणादायी व्याख्याते, कोल्हापूर जिल्हापरिषदेचे माजी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी मा. इंद्रजित देशमुख (काकाजी) यांचे 'करिअरच्या वाटेवरील तरुण व पालकांची कर्तव्ये' या विषयावर प्रबोधनपर व्याख्यान रविवार, दि. ११ ऑगस्ट, २०२४ रोजी सायं. ५.५० वाजता, समर्थ सदन, पंचपाळी हौदाजवळ, राजवाडा, सातारा येथे आयोजित केल्याची माहिती सातारा नगरपरिषदेचे माजी सभापती रविंद्र भारती-झुटिंग यांनी दिली. देशमुख साहेब गेली अनेक वर्ष शिवम अध्यात्मिक व सांस्कृतिक विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून घारेवाडी, कराड येथे युवकांना केंद्रबिंदू मानून काम करत आहेत. विशेष करुन इयत्ता दहावी, अकरावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना आपले करिअर निवडताना अथवा निवडलेल्या करिअरवर पुढे जात असताना योग्य मार्गदर्शनाची आवश्यकता असते.

**वडगांव नगरपंचायत, वडगांव**
ता. मावळ जि. पुणे ४१२१०६
स्थापना- ०३/०२/२०१८
Email: vadgaon9@gmail.com ०२११४-२३५४१०/११

जा.क्र. १७३१/२०२४ दिनांक - ०८/०८/२०२४

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहिर नोटिसेद्वारे कळविण्यात येते की, गाव मौजे वडगाव मावळ येथील नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. १६ स.नं/जुना. मि. नं. २२६२ नविन मा.क्र. २९० हि मालमत्ता श्री. मकरंद प्रताप ढोरे वडगांव मावळ यांचे मालकीची असून सदर ठिकाणी सुविधा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल व्यवसाय चालू आहे. तसेच नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. ५ स.नं. /जुना मि.नं. ३५० नविन मा.क्र.११ हि मालमत्ता श्री. पांडूरंग गेणु वहिले यांचे मालकिची असून सदर ठिकाणी चामुंडा मेडिकल सुरू करणे आहे. तरी सदर हॉस्पिटल व मेडीकल चालविणे कामी या दोन्ही मालमत्ता धारकांस व्यवसाय ना हरकत दाखला देणे आहे.

सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहित असल्याची व सदर मिळकतीबाबत कोणतीही कोर्टात वाद प्रलंबित नसलेची खात्री व भरवसा दिला आहे. तरी हि जाहिर नोटीस प्रसिद्धी करून तमाम लोकांस कळविण्यात येते कि, सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क,गहाण, दान, लीज, लीन, बक्षीस, साठेखत, खरेदीखत, अदलाबदल व अन्य प्रकारचे हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी त्याची हरकत ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाले पासून (७) सात दिवसांचे आत आमचेकडे समक्ष येऊन लेखी हरकतीने मूळ कागदोपत्री पुराव्यानिशी खात्री पटवून द्यावी. वरील मुदतीत कोणाचाही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही व तसे असल्यास त्यांनी तो जाणिवपूर्वक सोडून दिला आहे. असे समजून हॉस्पिटल व मेडीकल व्यवसाय ना हरकत दाखाला देणे कामी प्रक्रिया पुर्ण केली जाईल व त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत मान्य केली जाणार नाही. तरी सर्वांनी याची नोंद घ्यावी.

शिक्का

स्वाक्षरी/-
(डॉ. प्रविण निकम)
मुख्याधिकारी
वडगाव नगरपंचायत

## प्रहारच्या राज्यव्यापी आंदोलनामध्ये माण - खटावचे हजारो कार्यकर्ते सहभागी होणार : अरविंद पिसे

**दहिवडी :** प्रहार जनशक्ति पक्षाच्या वतीने छ. संभाजी नगर ( औरंगाबाद ) येथे शुक्रवार दि.९ रोजी होणार्या राज्यव्यापी आंदोलनामध्ये माण- खटाव तालुक्यातील हजारो कार्यकर्ते प्रहार जनशक्ति पक्षाचे सातारा जिल्हाध्यक्ष अरविंद पिसे यांच्या नेतृत्वाखाली सहभागी होणार असल्याची माहिती प्रहार जनशक्ति पक्षाचे माण तालुका अध्यक्ष नंदकिशोर पवार व खटाव तालुका अध्यक्ष अक्षय ननावरे यांनी दिली आहे.



प्रहार जनशक्ति पक्षाचे प्रमुख आ. बच्चु कडु यांनी राज्यभरातील सर्व दिव्यांगाना आंध्रप्रदेश सरकारच्या धर्तीवर महाराष्ट्र सरकारनेही प्रतिमहा ६ हजार रुपये पेन्शन दिली जावी, या सह इतर अनेक मागण्या राज्य शासनाकडे केली असुन या मागणीची पुर्तता होण्यासाठी शुक्रवार दि. ९ ऑगष्ट रोजी छ. संभाजी नगर याठिकाणी राज्यभरातील दिव्यागांचा व कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित केला आहे, या मेळाव्यासाठी प्रहार जनशक्ति पक्षाचे सातारा जिल्हाध्यक्ष अरविंद पिसे यांच्या नेतृत्वाखाली माण - खटाव विधानसभा मतदार संघातील हजारो कार्यकर्ते सहभागी होणार आहेत.

प्रहार जनशक्ति पक्ष हा सर्वसामान्यांच्या व दिव्यांगाच्या न्याय हक्कासाठी नेहमीच अग्रेसर राहिला आहे. सातारा जिल्ह्यातही या पक्षाने जिल्हाध्यक्ष पिसे यांच्या नेतृत्वाखाली मोठे जाळे निर्माण केले आहे. माण - खटाव विधानसभा मतदार संघात पिसे यांनी गत ७ वर्षापासुन दिव्यांग, निराधार महिला, व्यक्ती, जेष्ठ नागरीक, परितक्त्या, कला, क्रिडा आदींसाठी खुप मोठे काम प्रहार जनशक्ति पक्षाच्या माध्यमातुन केले आहे.

प्रहार जनशक्ति पक्षाचे प्रमुख आ. बच्चु कडु यांनी अरविंद पिसे यांचे आजवर सुरु असलेले कार्य पाहुनच राज्यात सर्व प्रथम विधानसभा निवडणुकीसाठी त्यांची उमेदवारी जाहिर केली असुन माण - खटावच्या पाणी प्रश्नाची सखोल माहिती असणारे व्यक्तीमत्व अशी अरविंद पिसे यांची ओळख असुन सर्वसामान्यांचा आधारवड ठरलेल्या पिसे यांच्या एका आवाहनामुळे माण - खटाव तालुक्यातील हजारो कार्यकर्त्यांनी छ. संभाजीनगर येथे होणार्या आंदोलन व मेळाव्यास उपस्थित राहण्याचे ठरवले आहे.

# लाडकी बहीण योजनेसाठी अजित पवार यांचा पुढाकार



**मुंबई** : रक्षाबंधनाचा दिवस जवळ येऊ लागलाय तसा लाडकी बहीण योजनेवरून सुरू असलेला वाद वाढतच चालला आहे . राज्यातील दीड कोटी पात्र लाडक्या बहिणींना येत्या १९ ऑगस्टला प्रत्येकी ३ हजार रुपयांचे रक्षाबंधन गिफ्ट दिलं जाणार असल्याचे समजतंय. आगामी विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सरकारनं ही योजना आखलीय. मात्र ही योजना टिकणे शक्य नाही, असा आक्षेप विरोधकांनी घेतला आहे. लाडकी बहिण सारख्या योजनांमधून लाच देऊन मते विकत घेण्याचा हा प्रयत्न आहे. महाराष्ट्र हा स्वाभिमानाने जगणारा आहे, भीकेवरती जगणारा नाही.

महाराष्ट्राला पाहिजे ते हक्काचं पाहिजे, अनेक घरात तरुण बेरोजगार आहेत, आणि त्या घरात त्यांच्या बहिणीला पंधराशे रुपये देऊन काय सरकारला काय साध्य करायचे आहे, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली आहे. तर निवडणुकीच्या दोन महिने आधी नंतर लाडक्या बहिणीला काही मिळणार नाही, लाडक्या बहिणींची काळजी घ्यावी लागणार आहे, एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांना आलेला लाडक्या बहिणीचा उबाळा हा निवडणुकीपूरता असल्याचा हल्लाबोल संजय राऊत यांनी केलाय. तर दुसरीकडे लाडकी बहीण योजना यशस्वी करण्यासाठी खुद्द उपमुख्यमंत्री अजित पवारांनी पुढाकार घेतलाय. माझी लाडकी बहीण योजना टिकवणे शक्य नसल्याचे विरोधी पक्ष सांगतात. परंतु अशक्य गोष्ट शक्य करणे हीच माझी ओळख आहे. तोच माझा स्वाभिमान आहे. ही कल्याणकारी योजना विरोधकांना बंद पाडायची आहे. ही योजना यशस्वीपणे राबवणे अशक्य आहे असे त्यांचे भाकित आहे.

येत्या काळात या योजनेची रक्कम वाढवण्यासाठी मी सर्वो तोपरी प्रयत्न करेन, असे ट्विट अजित पवारांनी केले आहे. अर्थमंत्री अजित पवार यांनीच यंदाचा अर्थसंकल्प मांडताना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना जाहीर केली. योजनेच्या श्रेयावरून महायुतीतच चढाओढ सुरू झाली आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना असे नाव असले तरी बॅनरवरून मुख्यमंत्री हा शब्द गायब आहे.

# मदत सोडून दिल्लीला मुजरा; व्यंगचित्रातून शिंदे गटाचे उद्धव ठाकरे यांच्यावर टीकास्त्र

**मुंबई** : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरे हे तीन दिवसांच्या दिल्ली दौऱ्यावर आहेत. यावरुन शिवसेना शिंदे गटाकडून उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार निशाणा साधण्यात आलाय. ठाकरे गटाकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर सातत्याने दिल्ली वाऱ्या करत असल्याचा आरोप केला जातो. या पार्श्वभूमीवर मंगळवारी दिल्लीत इंडिया आघाडीच्या बैठकीसाठी गेलेल्या उद्धव ठाकरेंवर शिवसेनेच्या वतीने व्यंगचित्राच्या माध्यमातून जोरदार टीका करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुण्यातील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी गेले असताना उद्धव ठाकरे दिल्लीत इंडी आघाडीच्या बैठकीसाठी जात असल्याच या व्यंगचित्रातून दाखवण्यात आले आहे.

उद्धव ठाकरे यांच्या सहकुटुंब तीन दिवसीय दिल्ली दौऱ्यावर शिवसेना शिंदे गटाने जोरदार टीका केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपला नियोजित दिल्ली दौरा रद्द करून सोमवारी पुण्यातील पूर परिस्थितीची पाहणी केली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी नागरिकांशी संवाद साधून मदत केली. तर उद्धव ठाकरे मात्र मंगळवारपासून इंडिया आघाडीच्या बैठकीसाठी तीन दिवसीय दिल्ली दौऱ्यावर आहेत, अस या व्यंगचित्राच्या माध्यमातून दाखवण्यात आल आहे. पुण्यातील पूरग्रस्त नागरिकांना मदत करण्याऐवजी दिल्लीत मुजरा करणे महत्वाचे, अशा आशयाचे व्यंगचित्र रेखाटून शिवसेना पक्षाने उद्धव ठाकरेंवर टीकास्त्र सोडले आहे. हे व्यंगचित्र शिवसेना पक्षाच्या अधिकृत फेसबुक पेजवर शेअर करण्यात आले आहे.

# चुकीला माफी नाही : नाना पटोले

**मुंबई** : राज्यात विधानसभेची निवडणूक दोन महिन्यांमध्ये जाहीर होईल. त्यामुळे या निवडणुकीच्या अनुषंगाने सध्या राज्याच्या राजकारणात घडामोडींना वेग आलेला आहे. सर्वच राजकीय पक्षांनी विधानसभेसाठी जोरदार तयारी सुरु केली आहे. महायुती आणि महाविकास आघाडीमधील पक्षांमध्ये जागावाटपा बाबतही खलबते सुरु आहेत. काही दिवसांपूर्वी राज्यात विधानपरिषद निवडणूक पार पडली होती. या निवडणुकीत महाविकास आघाडीला धक्का बसला होता. कारण विधानपरिषदेच्या निवडणुकीत काँग्रेसच्या काही आमदारांनी क्रॉस वोटिंग करत महायुतीच्या उमेदवारांना मतदान केल्याचा आरोप केला जात आहे. आता यावरूनच काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी विधानपरिषदेच्या निवडणुकीत क्रॉस वोटिंग करणाऱ्या आमदारांना इशारा दिला आहे. कोणत्याही बदमाशाला पक्षात स्थान नाही. चुकीला माफी नाही, असे नाना पटोले यांनी म्हटले आहे. काँग्रेसच्या हायकमांडकडून आता निर्णय घेण्यात आला आहे की, कोणत्याही बदमाशांना, यापुढे पक्षात स्थान दिले जाणार नाही.

काही लोक फक्त व्यापारासाठी पक्षात येतात. मात्र, याबाबतची स्पष्ट भूमिका काँग्रेस पक्षाने घेतलेली आहे, असे नाना पटोले यांनी आज माध्यमांशी बोलताना म्हटले आहे. काही दिवसांपूर्वी राज्यात विधान परिषदेची निवडणूक पार पडली होती. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा व्हीप न जुमानता महायुतीच्या उमेदवारांना काँग्रेसच्या काही आमदारांनी मतदान केले असल्याचा आरोप करण्यात येत आहे. काँग्रेसच्या हायकमांडने प्रदेश काँग्रेसच्या नेत्यांकडून अहवाल मागवला होता तर क्रॉस वोटिंग करत महायुतीला मदत करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी काँग्रेसमधील पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आली होती. आगामी विधानसभेला पत्ता कट करणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे.

याच पार्श्वभूमीवर बोलताना आज प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही सूचक वक्तव्य करत इशारा दिला आहे. क्रॉस वोटिंग करणाऱ्या आमदारासंदर्भात बोलताना नाना पटोले म्हणाले, कोणालाही अभय दिलेले नाही. ज्यांची कोणाची नाव यामध्ये आयडेंटिफाय झालेली आहेत, त्या कोणालाही अभय दिलेले नाही. कारण चुकीला माफी नाही, अशी भूमिका काँग्रेसच्या हायकमांडकडून घेण्यात आलेली आहे, असा इशारा नाना पटोले यांनी दिला आहे.

# पुणेकरांवर झिकाचे संकट

## शहरात एकूण ६६ रुग्ण, त्यात २६ गर्भवती महिला



**पुणे** : पुणे शहरात मागील महिन्याभरापासून झिका व्हायरसच्या रुग्णसंख्येत सातत्याने वाढ होत असल्याचे बघायला मिळतय. पुण्यातील झिका व्हायरसची लागण झालेल्या रुग्णांची संख्या आता ६६ वर पोहोचली आहे. त्यामध्ये २६ गरोदर महिलांचाही समावेश आहे. दरम्यान, रुग्णांच्या संपर्कात आलेल्या सर्वांची तपासणी पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून केली जाणार आहे.

याबाबत महापालिकेचे सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. सूर्यकांत देवकर म्हणाले, पुणे शहरात आत्तापर्यत एकूण ६६ झिकाचे रुग्ण आढळले आहेत. यापैकी २६ गरोदर महिला आहेत.

त्यामुळे ज्या भागातून रुग्ण आढळून आले आहेत. तेथे महानगरपालिकेच्या माध्यमातून सर्वेक्षण करण्यात येतय. पुढे ते म्हणाले, झिका व्हायरसपासून बचावासाठी नागरिकांनी संपूर्ण शरीर झाकले जाईल असे कपडे घालावेत, फ्रिज, कूलर, झाडांच्या कुंड्यांमध्ये पाणी साचू देऊ नये. तसेच ज्यांमध्ये झिका व्हायरसची लक्षणे आढळून आलीत त्यांनी तत्काळ महानगर पालिकेच्या रुग्णालयाशी संपर्क साधावा.

# निवडणुकीत मनसेच्या उमेदवारांवर बहिष्कार टाका

**मुंबई** : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आता सर्वच राजकीय पक्षांनी आपापली कंबर कसलीय. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी देखील स्वबळाचा नारा देत महाराष्ट्रात दौऱ्याला सुरुवात केलीय. मात्र, राज ठाकरेंनी सोलापूरमध्ये केलेल्या वक्तव्यामुळे आता ते अडचणीत येण्याची शक्यता आहे. राज्यात सर्व गोष्टी मुबलक प्रमाणात असताना आरक्षणाची गरज नसल्याचे ते म्हणालेत. त्यामुळे त्यांना आता मराठा आणि ओबीसी समाजाच्या रोषाला सामोरे जावे लागतय.

तसेच मराठा आणि ओबीसी समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा गाजत असताना राज ठाकरे यांनी असे वक्तव्य केल्यामुळे विरोधकांकडूनही टीका केली



जात आहे. त्यातच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष तथा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी देखील राज ठाकरेंवर हल्लाबोल केलाय. यासंदर्भात प्रसार माध्यमांशी संवाद साधत असताना रामदास आठवले म्हणाले, मफ्जोपर्यत जातीय व्यवस्था संपत नाही तोपर्यंत आम्ही आरक्षणाला धक्का लागू देणार नाही. आरक्षणासंदर्भात राज ठाकरेंनी घेतलेली भूमिका योग्य नाही. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत मनसेच्या उमेदवारांवर बहिष्कार टाकावाफ्फ तसेच दलित, आदिवासी आणि ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे, या प्रकारची मागणी सर्वप्रथम आपण केल्याचेही यावेळी आठवले यांनी सांगितले.

मराठा समाजाला आरक्षण मिळायलाच हवे. मात्र, ओबीसीमधून मराठा समाजाला आरक्षण द्यायला हवे ही मनोज जरांगे पाटील यांची मागणी म राठा समाजावर अन्याय करणारी आहे. महाराष्ट्रातील महायुतीच्या सरकारने मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिले असून त्याची अंमलबजावणी राज्यात सध्या सुरू असल्याचेही रामदास आठवले म्हणाले.

# मनसेचे १२ तारखेला आमरण उपोषण

**पाटण** : पाटण तालुक्यात मोरणा विभागात पनामा पवनचक्की कंपनीने उभारलेले अनाधिकृत टाँवर, शेतकरी व शासनाची केलेली फसवणूक याबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेना पाटण तालुकाध्यक्ष गोरख नारकर हे पाचगणी येथे सोमवार दि. १२ रोजी आमरण उपोषण करणार असल्याचे निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात म्हणले आहे की, मोरणा पठारावरती पनामा पवनचक्की कंपनीने आपले टाँवर उभारलेले आहेत. पनामा विंड कंपनी व ओ टू पाँवर यांनी मायक्रोसाईटिंग मार्गदर्शन सूचनांचे उल्लंघन करुन उभारण्यात आलेले टाँवर क्र. २५ व वनविभागालगत उभारलेले टाँवर यांचेवरती तातडीने कारवाई करावी या मागणी साठी मनसेने वेळोवेळी आंदोलन उपोषण केले होते.

बाधित शेतकरी व तक्रारदार यांनी पाचगणी व महाराष्ट्र महाउर्जा विकास अभिकरण पुणे याठिकाणी आंदोलन व उपोषण केले होते. तसेच शासनाची करत असलेली फसवणूक ही कागदोपत्री निदर्शनास आणून दिली होती. जिल्हाधिकारी महोदय यांच्या समावेत झालेल्या बैठकीत कंपनी व तक्रारदार यांची समोरासमोर कागदपत्रे व आरोपांची छानणी झालेली होते.

संबंधित कंपनीवरती तातडीने कारवाई करुन टाँवर क्र. २५ व वनविभागाच्या लगत उभारलेला अनाधिकृत व बेकायदेशीर मायक्रोसाईटिंग मार्गदर्शन सूचनांचे उल्लंघन करुन कंपनीने प्रशासानची व शेतकर्यांची फसवणूक केलेली आहे. कागदोपत्री तसेच प्रशासकीय स्तरावरती हे सर्व सिद्ध झालेले आहे. कंपनीच्या फसवेगिरी विरोधात अनेकदा लेखी व तोंडी सांगण्यात आले आहे.

सदर पवनचक्की कंपनी चे टाँवर तात्काळ बंद करण्यात यावे व सदर कंपनीला काळ्या यादीत टाकण्यात यावे. तसेच कंपनीने बेकायदेशीर पणे टाँवर उभारणी करुन करोडो रुपये मिळवून शासनाची फसवणूक केली आहे.

तो सर्व पैसा शासन दरबारी जमा करावा. याबाबत अनेकदा कागदोपत्री पुराव्यानिशी कंपनीचा गैरकारभार शासनास निदर्शनास आणून दिलेला आहे.

उपोषणानंतर होणार्या परिणामास कंपनी व प्रशासन जबाबदार राहिल असं उपोषकर्ती यांनी सांगितले आहे. सदर निवेदनाच्या प्रती, जिल्हाधिकारी सातारा, जिल्हा पोलिस प्रमुख सातारा, महाव्यवस्थापक महाउर्जा पुणे, प्रांताधिकारी पाटण, तहसीलदार पाटण, वनविभाग पाटण यांना देण्यात आले आहे.

## शहरात खड्ड्यांचा महापूर

# मुसळधारेने नाशिक पालिकेचे पितळ उघडे

**नाशिक** : पावसाळ्यापूर्वी शहरातील रस्त्यांवर दीडशे कोटींचे डांबर ओतल्यानंतरही पहिल्याच मुसळधार पावसात शहरातील रस्ते खड्यात गेल्याने 'श्रावणमासी त्रस्त माणसे, खड्डे दाटे चोहीकडे...' अशी स्थिती निर्माण झाली आहे. शहरभरातील रस्ते खड्ड्यात गेल्याने महापालिकेचे पितळ उघड झाले आहे. गेल्या महिनाभरापासून संततधारेमुळे रस्तोरस्ती खड्डे पडले असले, तरी शनिवार आणि रविवारच्या मुसळधार पावसामुळे खड्यात रस्ते शोधण्याची वेळ नाशिककरांवर आली आहे. विशेष म्हणजे शहरातील खड्डे बुजविण्यासाठी दरवर्षी अंदाजपत्रकात ३० कोटींची तरतूद केली जाते. त्यामुळे हा निधी कुठे जातो याबाबत



प्रश्नचिन्ह उपस्थित केला जात आहे.

महापालिका प्रशासनाकडून पावसाळ्यात डांबराने खड्डे बुजवता येत नसल्याचे सांगत 'जीएसबी'ने खड्डे बुजविण्याचे काम सुरू केल्याचा दावा केला जात आहे. शहरात जवळपास २३०० किलोमीटरचे रस्ते असून, त्यातील मुख्य रस्त्यांवर दरवर्षी दुरुस्तीसाठी करोडो रुपयांचे डांबर ओतले जाते. परंतु, दर पावसाळ्यात या रस्त्यांची खड्यांमुळे वाट लागते. त्यातच गेल्या तीन ते चार वर्षांपासून नाशिककरांना महापालिका आणि स्मार्ट सिटीच्या भोंगळ कारभाराचा फटका बसत आहे. पावसाळ्यापूर्वी जवळपास दीडशे कोटींचा निधी रस्ते दुरुस्तीसाठी खर्च करण्यात आला. परंतु, शहरातील चकचकीत आणि चांगल्या रस्त्यांची स्मार्ट सिटी कंपनी आणि एमएनजीएल कंपनीकडून विकासाच्या नावाखाली वाट लावली.

१५ मेनंतर शहरातील रस्ते खोदाईला महापालिकेने मनाई केली असतानाही स्मार्ट सिटी कंपनीकडून कामांसाठी भरपावसात रस्ते फोडले जात असल्याने खड्यात रस्ते शोधण्याची वेळ नाशिककरांवर आली आहे. स्मार्ट सिटीच्या नियोजनशून्य कारभाराचा फटका मात्र बांधकाम विभागासह शहरातील नागरिकांना बसत असल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे गेल्या दोन दिवसांत शहरात झालेल्या पहिल्याच मुसळधार पावसात रस्तेच वाहून गेले आहेत. पावसामुळे शहरातील रस्त्याचे तीनतेरा झाले असून, रस्तोरस्ती मोठे खड्डे पडल्याने अपघातांच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.

# बँकेच्या संचालकाना मारहाण; मनसेच्या जिल्हाध्यक्षासह ४ जणांवर गुन्हा दाखल

**कोल्हापूर** : सहकारी संस्था असलेल्या बँक अध्यक्षांसह उपाध्यक्षला मारहाण करुन जातिवाचक शिवीगाळ करून अपमान केल्याचे प्रकरण समोर आले. शिवीगाळ केल्याप्रकरणी मनसे जिल्हाध्यक्ष आणि माजी नगरसेवक राजू दिंडोर्ले यांच्या सह इतर ४ जणांविरोधात ट्रॉसिटीचा गुन्हा लक्ष्मीपुरी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

यापकरणी पोलिसांनी चारही संशयितांवर खंडणी, दरोडा आणि ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रंकाळा येथील श्री साईदर्शन जनता अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या माध्यमातून शुभम देशमुख आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी कर्ज देण्याची जाहिरात करून गरजूंकडून पैसे घेतले होते. याबाबत जाब विचारण्यासाठी सोमवारी ५ ऑगस्ट रोजी दुपारच्या सुमारास मनसेचे जिल्हाध्यक्ष आणि माजी नगरसेवक राजू दिंडोर्ले, पदाधिकारी प्रसाद पाटील, समर्थ कशाळकर, विकास कांबळे यांच्यासह इतर चार ते पाच जणांनी बँकेच्या केबिनमध्ये जाऊन बँकेचे अध्यक्ष सचिन साबळे आणि उपाध्यक्ष पाटील यांना जाब विचारत जातीवाचक शिवीगाळ करत बेदम मारहाण केली. कार्यालयाची तोडफोड करत कर्जाचे आमिष दाखवून काही लोकांकडून पैसे घेतल्याचे जबरदस्तीने लिहून घेतले. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा डीव्हीआर काढून लंपास केला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन देशमुख यांना चौकशीसाठी ताब्यात घेतलेआहे.

# महामार्गावरील खड्डे, वाहतूक कोंडीची मुख्यमंत्र्यांनी घेतली गंभीर दखल

**मुंबई** : ठाणे-नाशिक, मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील खड्ड्यांची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी रॅपिड क्विक हार्डनर, एम सिक्टी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत असून त्याचे काम प्रगतीपथावर आहे. हे काम तातडीने पूर्ण करुन नागरिकांना वाहतूक कोंडीतून दिलासा देण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राष्ट्रीय महामार्ग, एमएसआरडी, सार्वजनिक बांधकाम, वाहतूक पोलिस विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. नाशिक - भिवंडी रस्त्याच्या तातडीने दुरुस्तीसाठी युद्ध पातळीवर काम करण्याच्या सूचना देतानाच रस्ते दुरूस्तीच्या कामात हयगय करू नका. पीक अवरमध्ये अवजड वाहतुकीच्या नियमनासाठी कोकण विभागीय आयुक्तांनी एकत्रित अधिसूचना काढावी. अवजड वाहनांसाठी महामार्गालगत पार्किंग लॉट करावे, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे ठाणे, पालघर, नाशिक, रायगड जिल्ह्यातील महामार्गावरील वाहतूक कोंडी, आगामी गणेशोत्सव कालावधीतील वाहतुकीचे नियोजनाबाबत मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. बैठकीस मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव डॉ. आय. एस. चहल, प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, कोकण विभागीय आयुक्त पी. वेलारासू, जेएनपीटीचे अध्यक्ष उन्मेष वाघ, ठाणे पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे, पालघर जिल्हाधिकारी गोविंद बोडखे, नवी मुंबई महापालिका आयुक्त कैलास शिंदे, सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक दिलीप ढोले यांच्यासह राष्ट्रीय महामार्ग, एमएसआरडीसी, सार्वजनिक बांधकाम, परिवहन विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. ठाणे, नाशिक, रायगड जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्त, वाहतूक पोलिस अधिकारी दुरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते.

नाशिक- भिवंडी रस्त्याची दूरवस्था झाली आहे. यामुळे वाहतुकीसाठी अडचणी होत आहेत. पावसाळ्यात रस्त्याची अवस्था खराब झाली आहे. यामुळे वाहतुकीची कोंडी, अपघात होत आहेत. याची मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी गंभीर दखल घेतली असून रस्ता दुरुस्तीचे काम तातडीने सुरू करून ते चांगल्या दर्जाचे आणि जलद गतीने करावे, अशा सूचना दिल्या आहेत.

**जेएनपीटीमधून अवजड वाहनांचे नियंत्रण**

एकीकडे खड्डे बुजवण्याची कार्यवाही सुरू असताना वाहतूक नियमनासाठी ट्रॅफिक वॉर्डनची संख्या वाढविण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. जेएनपीटीकडून येणाऱ्या अवजड वाहनांमुळे वाहतूक कोंडीत भर पडू नये यासाठी या अवजड वाहतुकीचे नियमन करण्यासाठी जेएनपीटीमधून अवजड वाहनांचे नियंत्रण करण्यात यावे. त्याच्या समन्वयासाठी जिल्हाधिकारी ठाणे नोडल अधिकारी म्हणून नेमण्यात आले आहेत.

जेएनपीटी कडून पनवेल, पुणे, ठाणे कडे जाणाऱ्या महामार्गावरील खड्डे देखील तातडीने बुजविण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

# १९ वर्षीय विद्यार्थिनीवर चाकूहल्ला

**सांगली** : सांगलीत महाविद्यालयीन युवतीवर भर रस्त्यात हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सांगलीतील गर्दीने गजबजलेल्या कॉलेज कॉर्नर भागात हा प्रकार घडला. विशेष म्हणजे कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनीच्या पतीनेच तिच्यावर चाकूने हल्ला केल्याचा आरोप केला जात आहे. पोलीस या प्रकरणाची अधिक माहिती घेत आहेत. मात्र हा हल्ला नेमका कुठल्या कारणामुळे झाला, हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही.

सांगलीतील कॉलेज कॉर्नर भागात एका महाविद्यालयीन युवतीवर तिच्या पतीने चाकू हल्ला केल्याची अंगाचा थरकाप उडवणारी घटना समोर आली आहे. यात युवतीच्या हाताला गंभीर दुखापत झाली आहे. कॉलेजला जात असताना युवतीच्या पतीने हल्ला केला. दोघांचा काही महिन्यांपूर्वी प्रेम विवाह झाला असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. आज सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास सांगली कॉलेज जवळ तरुण आणि तरुणी गाडीवर बोलत बसले होते. त्या दोघात काही तरी वादावादी झाली अन् तरुणाने गाडीतून चाकू काढून तिच्यावर वार करायला सुरुवात केली. वार करत असताना तरुणीने हात आडवा केला. त्यामुळे हातावर वर्मी घाव बसलाय तेथील नागरिकांनी तिला तात्काळ सिव्हील हॉस्पिटलमध्ये दाखल केले. तिच्यावर उपचार सुरु असून प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.

तरुणीचे नाव प्रांजल काळे असून तिचे वय १९ वर्ष आहे. हल्लेखोराचे नाव मात्र समजू शकलेले नाही. या घटनेमुळे सांगलीत जवळपास २५ वर्षांपूर्वी घडलेल्या अमृता देशपांडे हत्या प्रकरणाच्या आठवणी ताज्या झाल्या आहेत. अमृता देशपांडे हिची एकतर्फी प्रेमातून हत्या करण्यात आली होती.

# धनंजय दातार यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार

**दुबई** : दुबईस्थित 'अदील ग्रुप ऑफ सुपर स्टोअर्स'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मसालाकिंग डॉ. धनंजय दातार यांना मुंबईच्या 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी' तर्फे दिला जाणारा 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार २०२४' देऊन गौरवण्यात आले आहे. धनंजय दातार यांनी सामाजिक क्षेत्रात विशेषतः वंचित जनांना न्याय देण्यासाठी केलेले उत्कृष्ट कार्य व योगदान यासाठी त्यांना हा पुरस्कार दिला गेला आहे. 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी' चे अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांनी नुकताच हा पुरस्कार दातार यांना दुबईत प्रदान केला. पुरस्कार स्वीकारल्या नंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना



डॉ. धनंजय दातार म्हणाले, उद्योगाइतकेच सामाजिक कार्यात रममाण व्हायला मला पूर्वीपासून आवडते.

समाजाने आपल्याला मोठे केले तर आपणही त्या देण्याची परतफेड करावी, अशी माझ्या आई-वडिलांची शिकवण होती. त्याला अनुसरुन मी माझ्या कमाईचा लक्षणीय हिस्सा नेहमी समाज कल्याणासाठी खर्च करत आलो आहे. शाळा, अनाथाश्रम, वृद्धाश्रम यांना दरवर्षी मदत केली, लाड कारंजा या माझ्या गावी सर्व समाजासाठी खुले असलेले मंगल कार्यालय बांधले आणि समाज सेवक विकास आमटे व सिंधुताई सपकाळ यांच्या लोककल्याण प्रकल्पांनाही मदत केली. मला यापूर्वी सामाजिक उद्योजकते साठी दिला जाणारा मास्टर दीनानाथ मंगेशकर स्मृती प्रतिष्ठानचा पुरस्कार मिळाला आहे.

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा पुरस्कार स्वीकारताना अत्यंत अभिमान वाटत आहे. वंचित समाजातील मुलांच्या तसेच आदिवासी मुलांच्या शिक्षण विकासासाठी मी दहा लाख रुपयांचा निधी पीपल्स एज्युकेशन सोसायटीकडे सुपूर्द करत आहे. डॉ. धनंजय दातार यांच्या समाज कल्याण कार्याविषयी गौरवोद्गार काढताना श्री. आठवले म्हणाले, पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली होती.